दैनिक

# प्रवक्ता लोकशाहीचा

PRAVAKTA LOKSHAHICHA

मुख्य संपादक - नितीन रावण मुजमुले, मो.नं.९६७३२१०४३८

Email :- pravaktalokshahicha@gmail.com Web :- https://pravaktalokshahicha.com

■ बीड (महाराष्ट्र) ■ दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०१ ■ अंक - २२१ ■ बुधवार दि. २२ एप्रिल २०२६ ■ आरएनआय - एमएचएमएआर/२५/ए२३६९ ■ किंमत २ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily ■ Marathi ■ Year - 01 ■ Issue - 221 ■ Wednesday Dt. 22 April 2026 ■ RNI: MHMAR/25/A2369 ■ Price - 2 Rupees ■ Pages 4

# सैनिक सुशील तेलगोटे हत्या; न्याय न मिळाल्यास मंत्रालयास घेरणार : भाई दिपक केदार

## सैनिकाच्या हत्येप्रकरणी अकोल्यात संताप; कठोर शिक्षेच्या मागणीसाठी अकोल्यात 'निळा जनउठाव' जनआक्रोश मोर्चा









### सैनिकाचे कुटुंब न्यायासाठी भटकत आहे

प्रशासनाकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने मोर्चेकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. एवढ्या कडक उन्हात एक शहीद सैनिकाचे कुटुंब न्यायासाठी भटकत आहे, आणि प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करत आहे, ही अत्यंत खेदजनक बाब आहे, असे मत आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केले.

**अकोला । प्रतिनिधी**

शहीद सुशील तेलगोटे यांच्या हत्येप्रकरणी आरोपींना कठोर शिक्षा देण्याच्या मागणीसाठी आज अकोल्यात 'निळा जनउठाव' जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक केदार यांच्या नेतृत्वात निघालेला हा मोर्चा ४५ डिग्री तापमानाच्या तीव्र उन्हात जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. मोर्चात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. पीडित कुटुंबीयांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे छायाचित्र हातात घेऊन न्यायाची मागणी केली. संतप्त वातावरणात राज्य सरकारने तात्काळ दखल घ्यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

दीपक केदार यांनी सरकारवर टीका करताना म्हटले की, देशासाठी लढणाऱ्या सैनिकाची निर्घृण हत्या झाली, तरीही राज्य सरकारकडून कोणतीही संवेदनशील दखल घेतली जात नाही. पीडित कुटुंबीयांशी गृहमंत्र्यांनी संपर्क साधलेला नाही, तसेच कोणतेही लोकप्रतिनिधी अंत्यविधीस उपस्थित राहिले नाहीत, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. मोर्चेकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्याचा प्रयत्न केला; मात्र प्रशासनाकडून प्रतिसाद मिळत नसल्याची नाराजी व्यक्त करण्यात आली. एवढ्या उन्हात सैनिकाचे कुटुंब न्यायासाठी आले असताना त्यांची दखल घेतली जात नाही, यापेक्षा दुर्दैव काही असू शकत नाही, असेही केदार यांनी नमूद केले.

या प्रकरणात आरोपींवर कठोर कारवाई करण्याच्या मागण्या करण्यात आल्या असून, त्यामध्ये फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालवून फाशीची शिक्षा देणे, एसआयटीमार्फत सखोल चौकशी करणे, पीडित कुटुंबाला १ कोटी रुपयांची आर्थिक मदत व शासकीय नोकरी देणे, तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणे यांचा समावेश आहे.

मोर्चात जिल्हा अध्यक्ष परवेज खान, बौद्ध संघर्ष समितीचे जीवन डिगे, युवा विदर्भ अध्यक्ष संकेत जाधव, आयोजक मनोज इंगळे, टिल्लू गवई, नागेश खरात, दिलीप वानखेडे, आसिफ शेख, दीपक गोपनारायण, भुर्या डोंगरे, आरिफ शाह, रफिक शाह, प्रफुल्ल वाघ, राष्ट्रपाल तेलगोटे आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. दरम्यान, न्याय मिळाला नाही तर आगामी काळात आंदोलन मंत्रालयावर धडकेल अशा गर्भित इशारा दीपक केदार यांनी दिला!

### सैनिकाची हत्या सरकारला गांभीर्य नाही : केदार

ऑल इंडिया पँथर सेनेचे अध्यक्ष भाई दीपक केदार यांनी राज्य सरकारवर तीव्र शब्दांत टीका केली. देशासाठी सेवा करणाऱ्या एका सैनिकाची निर्घृण हत्या झाली, तरीही राज्य सरकारकडून याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. पीडित कुटुंबीयांशी गृहमंत्र्यांनी साधा संपर्कही साधलेला नाही. अंत्यसंस्काराच्या वेळी कोणतेही लोकप्रतिनिधी उपस्थित नसणे ही अत्यंत दुर्दैवी आणि लाजिरवाणी बाब आहे, असे ते म्हणाले. सरकारने तात्काळ या प्रकरणाची दखल घ्यावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

## बीड जि.प. मध्ये महापुरुषांचे पूर्णाकृती पुतळे बसविण्यात यावेत : पप्पु कागदे

**महापुरुषांच्या पुतळ्याची उंची वाढविण्यात यावी रिपाइंची मागणी**

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा परिषदेच्या नवीन प्रशासकीय ईमारतीच्या परिसरामध्ये छत्रपती शाहु महाराज, महात्मा जोतिबा फुले, व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर या तिन्ही महापुरुषांचे १२ फुटी पूर्णाकृती पुतळे बसविण्यात यावेत. अशी मागणी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केली आहे.

बीड जिल्हा परिषदेच्या नवीन प्रशासकीय ईमारतीच्या परिसरामध्ये छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ४ फुटी अर्धाकृती पुतळे, छत्रपती संभाजीराजे भोसले



यांचा १२ फुटी पूर्णाकृती पुतळा, लोकनेते स्व गोपीनाथराव मुंडे व लोकनेते सुंदरराव सोळंके यांचा १० फुटी पूर्णाकृती पुतळा बसविण्याचा ठराव पास करण्यात येवून मान्यता देण्यात आली आहे. ही बाब अभिनंदनिय असून बीड जि.प.ने घेतलेल्या निर्णयाचे रिपाइंच्या वतीने स्वागत करण्यात येत आहे. वास्तविक पाहता थोर महापुरुषांचे पुतळे पुर्णाकृती बसविणे महत्वाचे आहे. शोषीत, पीडित उपेक्षीत समाज बांधवांना त्यांचे न्याय, हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी व सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, परिवर्तनासाठी आयुष्यभर संघर्ष करणाऱ्या, छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले, व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या तीन महापुरुषांचे ४ फुटी अर्धाकृती पुतळे बसविण्याचा ठराव बीड जिल्हा परिषदेच्या सर्व साधारण सभेमध्ये पास करण्यात आला आहे. फुले, शाहू, आंबेडकर या थोर महापुरुषांच्या पुतळ्याची ठरावात मंजूर करण्यात आलेली ४ फुटाची उंची वाढवून बीड जिल्हा परिषदेच्या नविन प्रशासकीय इमारतीच्या परिसरात छ.शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले, व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांचे १२ फुटी पूर्णाकृती पुतळे बसविण्यात यावेत. अशी मागणी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

## पेठ बीड पोलीसांनी जनावरे चोरणाऱ्या तिघांना अटक

### १५ हजार रुपये किंमतीचे एक गोवंशीय गोऱ्हे व ४ लाख रुपये किंमतीचे बोलेरो पिकअप केले जप्त

**बीड । प्रतिनिधी**

पोलीस निरीक्षक श्री. मारुती खेडकर हे स्टाफ सह सरकारी वाहनाने पोस्टे पेठ बीड हददीमध्ये पेट्रोलींग करत असताना मोबाईलवर माहीती मिळाली की, जी. एन. फक्शन हॉल जवळ जनावरे चोरणारे लोक व पिकअप टेम्पो पकडला लोकांनी पकडला आहे. अशी माहीती मिळताच पोलीस निरीक्षक खेडकर यांनी त्यांचे सोबत असणारे स्टाफ सह मिळालेल्या माहीतीच्या ठिकाणी गेले व आणखी स्टाफ पोलीस स्टेशनमधुन बोलाकुन घेवुन जनावरे चोरणारे लोक व त्यांच्या ताब्यातील बोलेरो पिकअप क्र.एम.एच.२३ ए.यु. १०१५ असलेले व त्यामध्ये असणारे गोवंशीय जातीचे गोऱ्हे त्याचे चारही पाय कासऱ्याने क्रूरपणे बांधलेले मिळुन आले ते पोलीस ठाणे पेठ बीड येथे आणुन सदर आरोपी यांना



विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी सदरचे गो-हे हे कत्तल करण्यासाठी चोरुन नेत असल्याचे सांगीतले. त्यांना त्यांची नावे विचारली असता त्यांनी त्यांची नावे १. अशीम जाफर कुरेशी रा. महमदीया कॉलनी २. अजिम आझाद कुरेशी रा. महमदीया कॉलनी ३. कुरेशी शहनवाज कुरेशी एजाज रा. कुरेशी मोहल्ला पेठ बीड असे सांगुन त्यांनी चोरीचा गुन्हा केल्याचे कबुल केल्याने फिर्यादी सईद अब्दुल करीम कुरेशी वय ५१ वर्षे रा. मोमीनपुरा यांच्या तक्रारीवरून पोलिस स्टेशन पेठ बीड गु.र.नं. ११६/२०२६ कलम ३०३ (२), ३ (५) बीएनएस सह (५)११ ५ (अ) ८ महा. प्रणी संरक्षण अधि. १९७६ प्रमाणे गुन्हा दाखल करुन सदर आरोपी यांचे ताब्यातुन ४,१५,०००/ रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करुन त्यांची पुढील तपासकामी पोलीस कोठडी घेण्यात येवुन पोलीस हवालदार माने पुढील तपास करत आहेत. सदरची कारवाई ही मा. पोलिस अधिक्षक श्री. नवनीत काँवत साहेब, अपर पोलिस अधिक्षक श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. वेंकटराम भा.पो.से यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मारुती खेडकर, पोलीस उपनिरीक्षक मन्सुर शहा, पोहेका सुभाष मोठे, पोह नितीश माने पोलीस नाईक अजित शिक्तोड, पोलिस कॉस्टेबल विष्णु गुजर, पोशि गिरी, पोशि अशोक परझने, पोशि शिवाजी राख यांनी या गुन्हयातील आरोपी यांना तात्काळ ताब्यात घेतले व सदर गुन्हयात अटक केले आहे.

## जमिनीच्या वादातून सख्या भावाकडून जीवघेणा हल्ला

**लोखंडी रॉडने बेदम मारहाण करत दांपत्याला केले जखमी**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यातील राडी येथे जमिनीच्या कारणावरून सख्या भावांमध्ये वाद होऊन त्याचे रूपांतर जीवघेण्या हल्ल्यात झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. वडिलोपार्जित आणि आईकडून मिळालेल्या जमिनीच्या वाटणीवरून हा वाद झाला असून, आरोपींनी फिर्यादी आणि त्यांच्या पत्नीला लोखंडी रॉड व लाकडी काठीने गंभीररीत्या जखमी केले आहे.

या प्रकरणी महादेव श्रीमती गंगणे (वय ५५ वर्षे, रा. राडी) यांनी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, ते आणि त्यांची पत्नी कमलाबाई ११ एप्रिल २०२६ रोजी दुपारी दीडच्या सुमारास त्यांच्या शेतात लिंबाच्या झाडाखाली विश्रांती घेत होते. यावेळी त्यांचा भाऊ बळीराम श्रीमती गंगणे, पुतणे अक्षय बळीराम गंगणे, अजय बळीराम गंगणे आणि भावजय सरलाबाई बळीराम गंगणे हे संगणमत करून दोन मोटारसायकलवरून तिथे आले. आरोपी अजयने जिवे मारण्याच्या उद्देशाने आपली मोटारसायकल महादेव यांच्या अंगावर घातली. त्यानंतर अक्षयने लोखंडी रॉडने त्यांच्या डोक्यावर उजव्या बाजूला प्रहार केला. या झटापटीत भाऊ बळीरामने काठीने महादेव यांच्या हातापायावर आणि पाठीवर मारहाण केली, तर सरलाबाईने फिर्यादीच्या पत्नीला लाकडी काठीने बेदम मारले. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या महादेव यांच्यावर लातूर येथील सह्याद्री रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९, ११५(२), ११८(१), ३५१(२), ३५१(३), ३(५) आणि ३५२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रंगनाथ जगताप करत आहेत.

## चाकूने वार करून रॉबरी करणारा आरोपी जेरबंद

**बीड शहर पोलिसांची कारवाई**

**बीड । प्रतिनिधी**

शहर पोलिसांनी गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपीस अटक करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे.दि. ०५/०४/२०२६ रोजी सायंकाळी अंदाजे ०५.०० वा. बस स्थानक समोर, वंदना हॉटेल, बीड येथे फिर्यादी उमेश सुनील पारिक (वय ३० वर्षे, रा. काशी नगर, जालना रोड, बीड) यांच्यावर आरोपीने चाकूने वार करून जबरदस्तीने मोबाईल फोन लुटला होता. सदर घटनेत फिर्यादीच्या तोंडावर व पाठीवर मारहाण करून जखमी करण्यात आले असून, त्यांच्या खिशातील ओप्पो -११ कंपनीचा मोबाईल (अंदाजे किंमत रु. २०,०००/-) जबरदस्तीने काढून आरोपी घटनास्थळावरून फरार झाला होता.

या प्रकरणी पोलीस स्टेशन बीड शहर येथे गुन्हा क्रमांक ००७४/२०२६ प्रमाणे भारतीय न्याय संहिता कलम ३०९ (६) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान पोलिसांनी माहितीकारांचे जाळे व तांत्रिक विश्लेषणाचा वापर करून आरोपीचा



शोध घेत अखेर विनोद मुळे (रा. भाजी मंडई, बीड शहर) यास ताब्यात घेऊन अटक केली. त्याच्याकडून गुन्ह्यातील मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. सार्वजनिक ठिकाणी दहशत निर्माण करणारे, मारामारी व रॉबरीसारखे गंभीर गुन्हे करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत यांनी दिले असून, त्यानुसार ही तात्काळ कारवाई करण्यात आली आहे. अशा गुन्हेगारांवर पुन्हा गुन्हे होऊ नयेत यासाठी प्रतिबंधात्मक कारवाईही करण्यात येणार आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक बीड श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. व्यंकट राम यांच्या देखरेखीखाली, पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, पोलीस हेड कॉन्स्टेबल जाधव यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. बीड शहर पोलीसांची गुन्हेगारीवर कडक कारवाई, नागरिकांची सुरक्षितता हीच प्राथमिकता.

## सिरसदेवी तलवडा येथील अंमली पदार्थ गांजा विक्रेत्यावर छापा टाकुन गांजा जप्त

**बीड । प्रतिनिधी**

दि.२०.०४.२०२६ रोजी पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड स्थानिक गुन्हे शाखा बीड यांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, मौजे सिरसदेवी ता. गेवराई जि. बीड गावामध्ये एक इसम अंमली पदार्थ गांजा जवळ बाळगुन त्याची चोरटी विक्री करत आहे.

मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी जावुन खात्री करून कारवाई करण्याचे आदेश पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड यांनी पोउपनि सुशांत सुतळे, पोह आनंद मस्के, विकास राठोड, राहुल शिंदे, अंकुश वरपे, बबन सलगर, चापोह अतुल हराळे तसेच पोस्टे तलवडा येथील सपोनि जंजाळ, पोउपनि अन्नलदास, पोह/देवकते, गडदे, जावळे, राठोड, जाधव व मपोअ/मदने असेंना आदेश दिल्याने सदर पथकाने नमुद ठिकाणी जावुन मौजे सिरसदेवी येथील इसम नामे शेख रईस शेख युसूफ वय २५ वर्षे रा. सिरसदेवी ता. गेवराई जि.बीड



याच्या राहते घरी छापा टाकुन त्याच्या राहते घरातुन बेकायदेशिररित्या ८ किलो ८८८ ग्रॅम वजनाचा किमंती २,६६,६४०/- रूपयाचा अंमली पदार्थ गांजा विक्री करण्यासाठी जवळ बाळगतांना मिळुन आला म्हणुन त्याचे विरूध्द पोस्टे तलवडा येथे गुरन. १२०/२०२६ कलम ८(क), २० (व) एनडीपीएस अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनिल कटके, पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि सुशांत सुतळे, पोह/आनंद मस्के, विकास राठोड, राहुल शिंदे, अंकुश वरपे, बबन सलगर, चापोह अतुल हराळे व पोस्टे तलवडा येथील सपोनि जंजाळ, पोउपनि अन्नलदास, पोह/देवकते, गडदे, जावळे, राठोड, जाधव व मपोअ/मदने सर्व नेमणूक पोलीस ठाणे तलवडा यांनी मिळून केली आहे.

# तृणमूलचे वर्चस्व ठरणार भाजपासाठी कडवे आव्हान?

पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुका तोंडावर आल्या आहेत. जंगलमहल या भागात ममता बॅनर्जीच्या तृणमूल काँग्रेस व भाजपामध्ये जोरदार लढत होण्याची शक्यता आहे. झाडग्राम, पश्चिम मेदिनीपूर, पुरुलिया आणि बंकुरा या जिल्ह्यांचा जंगलमहल भागात समावेश होतो. जंगलमहल हा भाग एकेकाळी डाव्या पक्षांचा बालेकिल्ला होता. त्यानंतर हा भाग माओवाद्यांचा गड झाला. २०११ च्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसने (टीएमसी) जंगलमहलवर वर्चस्व प्रस्थापित केले. आता या भागात तृणमूल काँग्रेसचे वर्चस्व आहे. भाजपाने जंगलमहल ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. जंगलमहल भागात लोकसभेच्या एकूण ६ जागा आहेत. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने ५ जागा जिंकल्या, तर टीएमसीने फक्त एक जागा जिंकली होती. जंगलमहल भागात विधानसभेच्या एकूण ४० जागा आहेत. २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेस दमदार कामगिरी करत २४ जागा जिंकल्या होत्या, तर भाजपाला १६ जागा जिंकता आल्या होत्या. भाजपाने पुरूलिया आणि बंकुरा या जिल्ह्यांमध्ये चांगली कामगिरी केली होती. तर झाडग्राम आणि पश्चिम मेदिनीपूरमध्ये भाजपाला दारुण पराभवाचा सामना करावा लागला होता. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसने कामगिरीत सुधारणा करत चार जागा जिंकल्या होत्या, तर भाजपाच्या वाट्याला फक्त दोन जागा आल्या होत्या. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसने ३० जागा तर भाजपाने फक्त १० जागांवर विजय मिळवला होता. पश्चिम बंगालमध्ये निवडणूक आयोगाकडून मतदारयाद्यांची फेरतपासणी (एसआयआर) करण्यात आली आहे. त्यामुळे अनेक मतदारांची नावे मतदारयादीतून वगळण्यात आल्याचा मुद्दा सध्या पश्चिम बंगालच्या राजकारणात वादग्रस्त ठरला आहे. परंतु, जंगलमहल भागात एसआयआर प्रक्रियेतून खूपच कमी मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. एसआयआर प्रक्रियेतून जंगलमहल भागातील ४० विधानसभा मतदारसंघांतून ५ हजारांहून कमी मतदारांची नावे वगळण्यात आली आहे. जंगलमहल भागात आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या भागात घेतलेल्या प्रचार सभांमध्ये द्रौपदी मुर्मू यांच्या दौऱ्यात पश्चिम बंगाल सरकारकडून झालेल्या निष्काळजीपणावर भाष्य केले. 'आदिवासींचा अपमान' झाल्याची टीका नरेंद्र मोदींनी केली होती. आदिवासींशी संबंधित नववी आंतरराष्ट्रीय संथाल परिषद उत्तर बंगालमध्ये ७ मार्च रोजी आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या स्वागतासाठी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी अथवा सरकारमधील कोणीही मंत्री उपस्थित नव्हते. त्यामुळे मूर्मू यांनी पश्चिम बंगाल सरकारवर तीव्र नाराजी व्यक्त केली होती. पश्चिम बंगाल सरकारकडून राष्ट्रपतींच्या कार्यक्रमाचे ठिकाणही सुरक्षेच्या कारणास्तव ऐनवेळी बदलण्यात आले होते. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी भाजपावर आदिवासींच्या मुद्द्यावरून हल्लाबोल केला आहे. भाजपाच्या जाहीरनाम्यात समान नागरी कायदा लागू करणार असल्याचे नमूद आहे. समान नागरी कायद्यावरून बॅनर्जी यांनी भाजपावर जोरदार टीका केली. मेदिनीपूर येथे झालेल्या सभेत ममता बॅनर्जी म्हणाल्या, भाजपाच्या जाहीरनाम्यात समान नागरी कायद्याबद्दल सांगण्यात आले आहे. समान नागरी कायदा लागू झाल्यास धार्मिक आचरण व तुमच्या श्रद्धांवर घाला घातला जाईल. तुमची संस्कृती, परंपरा आणि शिक्षण तुमच्याकडून हिरावून घेतले जाईल. समान नागरी कायदा विविधतेला उद्ध्वस्त करतो. त्यांना सगळं काही एकसंध करायचं आहे. आम्ही समान नागरी कायद्याला विरोध करू कारण तो धोकादायक आहे, असे ममता बॅनर्जी म्हणाल्या होत्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी जंगलमहल येथे झालेल्या प्रचारसभेत म्हणाले, तृणमूल काँग्रेसने आदिवासींकडे दुर्लक्ष केले आहे. त्यांच्या जमीनी हडप केल्या. आदिवासींना भ्रष्टाचार, भय यांमध्ये अडकवले. घुसखोरीमुळे बंगालची भाषा आणि संस्कृती बदलत आहे, अशी टीका मोदींनी केली. पश्चिम बंगालमध्ये कुडमी समुदायाची लोकसंख्या जवळपास ५० लाख आहे. कुडमी समुदायाचा समावेश ओबीसीमध्ये आहे. जंगलमहल भागातील पुरूलिया, झाडग्राम आणि बंकुरा जिल्ह्यांमध्ये कुडमींची संख्या मोठी आहे. कुडमींनी मागील काही वर्षांमध्ये सातत्याने रस्ते व रेल्वे अडवून आंदोलने केली आहेत. कुडमी समाजाला अनुसूचित जमातींमध्ये सामाविष्ट करा. कुरमाली भाषेला आठव्या परिशिष्टात सामील करा, अशी मागणी कुडमींनी केली आहे. दरम्यान, जंगलमहलमधील आदिवासींनी कुडमी समुदायाच्या आंदोलनाला विरोध केला आहे. तृणमूल काँग्रेस व भाजपा या दोन्ही पक्षांनी यंदा कुडमींची संख्या जास्त असलेल्या मतदारसंघांमध्ये कुडमी उमेदवार दिले आहेत. २०११ मध्ये तृणमूल काँग्रेसची जंगलमहलमध्ये सत्ता येण्यापूर्वी तिथे माओवाद व नक्षलवाद फोफावला होता. माओवाद संपवल्याचे श्रेय तृणमूल काँग्रेस पक्ष जंगलमहलमध्ये निवडणूक प्रचारात घेत आहे. तसेच विकासाने व चांगल्या प्रशासनाने तेथील हिंसाचार थांबवल्याचे तृणमूल काँग्रेसने म्हटले आहे. भाजपाला या भागात अँटी इंकम्बसीचा फायदा होऊ शकतो. जंगलमहल भागात विकासकामे कमी झाली आहेत. त्यामुळे विकासकामांचा फटका तृणमूल काँग्रेसला बसू शकतो. भाजपाने जंगलमहल भागात हिंदुत्वावर भर दिला नसून तृणमूल काँग्रेसच्या ठिसूळ कारभाराचा मुद्दा उचलला आहे. पाणी टंचाई, भू माफिया, अतिक्रमण आणि फेक कास्ट सर्टिफिकेट या मुद्द्यांवर भाजपाने तृणमूल काँग्रेसला लक्ष्य केले आहे.

# आत्मा-परमात्मा ही बहुजन समाजाचे शोषण करण्याची गुरुकिल्ली आहे

भारतात हिंदू धर्मात अशी धारणा आहे की, मनुष्य मृत झाला तरी आत्मा मरत नाही तर, चौर्यांशी लक्ष जन्म घेऊन मग परत मानवी जन्म घेतो. आता यावर आपला बहुजन समाज विश्वास ठेवतो. बौद्ध धर्म (धम्म) सोडला तर इतर बहुतेक धर्मात या धारणा आहेत पण या धारणा किती फसवेगिरी आणि आपल्या समाजाचे शोषण करणार्या आहेत, याचा आपणास परामर्श या लेखात घ्यायचा आहे. आपल्याकडे बहुजन समाज एखादा व्यक्ती मृत झाला आणि त्याचा अंत्यविधी झाल्यावर त्याप्रसंगी बोलताना किंवा एखादा मोठा नेता मृत झाला तर श्रद्धांजली अर्पण करताना अनेक लोकांकडून सहज बोलल्या जाते की, मृत आत्म्यास शांती मिळो आता हे वाक्य बोलतना कोणी या मृत आत्मा या शब्दाची चिकित्सा करीत नाही. कारण हिंदू धर्मात धर्माची चिकित्सा करण्याचे स्वातंत्र्य नाही हा सर्वात मोठा दोष आहे. आणि त्यामुळे हेच अगोदर आपल्याला सांगणार आत्मा अमर आहे आत्म्याला हवा ,पाणी, आग हे स्पर्श करू शकत नाहीत किंवा नष्ट सुद्धा करू शकत नाहीत. आणि आता सांगायचे की, मृत आत्म्यास शांती मिळो आता याला दांभिकपणा नाही तर काय म्हणावे अशा बर्याच गोष्टी आहेत यात सर्व गोंधळ आहे. पण भटास घाबरून सर्व चालू आहे. आणखी एक मोठा दांभिकपणा म्हणजे गीता या ग्रंथात कर्मसिद्धांत आहे की, कर्म करा पण फळाची अपेक्षा करू नका तर लगेच पुढे असेही म्हटले आहे की, तुम्ही जे कर्म करणार आहात त्याचे फळ तुम्हाला मिळेल. आता या दोन बाबी परस्परविरोधी आहेत. यामुळे माणूस गोंधळून जातो की, काय करावे आता आपण समाजात अनेक घटना पाहतो आणि कांही लोकांचा स्वत:चा अनुभव सुद्धा असतो की, एखाद्या व्यक्तीने त्याच्या जीवनात अनेक चांगली कर्मे केलेली असतात. पण त्याचे परिणाम त्याला चांगले मिळत नाहीत आणि कांही व्यक्ती सतत वाईट कर्म करतात पण त्याचे काहीच वाईट होत नाही. या घटना आपण समाजाचे निरीक्षण करतांना आपणास सहज दिसतात. आणि त्यामुळे गीतेतील हा सिद्धान्त समाजातील चिकित्सक लोकांना गोंधळात टाकणारा आहे. पण पुन्हा तेच आहे की, धर्माची चिकित्सा करू नका म्हणजे डोळे बंद करून आणि मेंदूचा वापर न करता जर आपण हिंदू धर्मातील अनेक गोष्टीचे पालन केले तर मग काही अडचण नाही. पण आज समाजात लोक शिक्षण घेत आहेत आणि काही लोक चिकित्सा सुद्धा करू लागले आहेत. पण बहुतांश लोक धर्म आणि धर्माचे पूरोहित यांना घाबरतात आणि त्यामळे समाजात शोषण चालू आहे. बहुजन समाज हा आज भीतीयुक्त वातावरणात जीवन जगत आहे. त्यामुळे अनेक चुकीच्या गोष्टी तो स्वीकारत आहे. आपण आता आत्मा या घटकाचे जरा चिकित्सक विश्लेषण करू.

हिंदू धर्म मान्यतेनुसार आपण विचार केला तर एकदा माणूस मृत्यू पावला तर त्याचा आत्मा एक तर स्वर्गात जाईल किंवा नरकात जाईल. आणि एखाद्या व्यक्तीने समजा वाईट कर्म केले असेल तर त्याला नरकात यातना भोगाव्या लागतील आणि पहिले असे सांगितले आहे की, आत्म्याला हवा ,पाणी आणि अग्नी यावर परिणाम करू शकत नाहीत. मग आता प्रश्न आहे की, आत्मा तर अमर आहे आणि शरीर तर या पृथ्वीवर जाळले किंवा दफन केले म्हणजे शरीर इथेच नष्ट झालेले आहे. तर मग प्रश्न असा आहे की, त्या नरकात यातना कोणाला देणार ? आणि स्वर्गात गेला तर तिथे जे सुख किंवा मौज -मजा असणार आहे त्याचा उपभोग कोण घेणार ? याचा विचार करायला कोणीच तयार नाही मग तो बहुजन हिंदू धर्मीय व्यक्ती कितीही उच्च शिक्षित असेल तरीही या घटनेची चिकित्सा करीत नाही. आणखी एक महत्वाचा दोष यात आहे की, शरीर मृत झाल्यावर आत्मा ८४ लक्ष जन्म झाल्यावर मग पुन्हा माणूस जन्म घेतो. याचा आपण थोडा चिकित्सक अभ्यास केला तर हे किती थोतांड आहे हे लक्षात येते म्हणजे आपल्या देशात पदवी अभ्यासक्रमात लोकसंख्या हा विषय अभ्यासाला आहे आणि त्यात सांगितले आहे की, देशाची लोकसंख्या वाढण्याचे एक कारण म्हणजे जन्मदर जर मृत्यूदारापेक्षा जास्त असेल तर लोकसंख्या वाढते. आणि मृत्यूदर कमी का आहे तर कोणत्याही देशात जेंव्हा अरोग्य सुविधा चांगल्या दर्जाच्या मिळतात तेंव्हा मृत्यूदर कमी होतो मग महत्वाचा प्रश्न आहे की, आपल्या देशात स्वातंत्र्यानंतर १९५१ ला पहिली जनगणना झाली तेंव्हा ३५ कोटी किंवा ४० कोटी जी लोकसंख्या असेल तेवढीच असली पाहिजे. मग हे लोक वाढले कसे ? हा मूळ प्रश्न आहे. कारण एका आत्म्याचे दोन आणि आज १५० कोटी आत्मे कसे झाले ? याचा अर्थ एकच आत्मा केवळ एकाच वेळी जन्म घेतो हे खोटे आहे. हेच आपण यावरून सिद्ध करू शकतो. यात तर घट झाली पाहिजे कारण पुन्हा एक भीती आपल्याला दाखवली आहे की, कांही आत्मे इथेच भटकत असतात कारण ते आतृप्त असतात म्हणजे एखादा व्यक्ती अपघात झाला ,आत्म्हहत्या केली किंवा एखाद्याचा खून झाला तर तो आतृप्त आत्मे इथेच राहतात ते जन्म मरणाच्या फेर्यात जात नाहीत त्यांना हे हिंदू धर्म सांगणारे भूत पिशाच्य असे म्हणतात. आता जगात अमेरिकेसारखा विकसित देश यावर अभ्यास करून झाला आहे की, या जगात भूत नाही आणि यापेक्षा आपले अनींसवाले कित्येक वर्षापासून लोकांना जागृत करीत आहेत स्मशानात जाऊन आमवस्येला कार्यक्रम घेत आहेत , स्मशानात जाऊन रात्री आमवस्येला १२ वाजता मुलांना घेऊन जेवण करीत आहेत. तरी आमचे हिंदू धर्माचे रक्षक हे मानायला तयार नाहीत की, भूत ,पिशाच्य नाही. उलट या हिंदूधर्म रक्षकांना या अंधश्रद्धा निर्मूलन समितीची भीती वाटली असेल कदाचीत की, हे लोकांना सत्य सांगत आहेत त्यामुळे या समितीचे प्रमुख डॉ. नरेंद्र दाभोळकर यांचा खून हिंदू धर्म रक्षकांच्या कार्यकर्त्यांनी केला आणि सुरूवातीला मान्य केले नाही पण मग न्यायालयाने सिद्ध केल्यावर शांत झाले आणि हेच दोषी निघाले. आणि अशाच सत्य सांगणार्या गोविंद पानसरे, कलबुर्गी आणि गौरी लंकेश यांना सुद्धा सूडबुद्धीने संपविले याचा विचार केला तर एकच स्पष्ट होते की, यांना सत्य नको आहे, समाज जागृत नको आहे. कारण आत्मा-परमात्मा हे बहुजन समाजाचे शोषण करण्याची गुरुकिल्ली. आणि हे शोषण तो पर्यंत चालू राहील जो पर्यंत हे आपल्याला मूर्ख बनविणार आहेत. आणि मग मूळ प्रश्न आहे की, हे आतृप्त आत्मे सुद्धा या लोकसंख्येतून कमी झाले पाहिजे मग लोकसंख्या वाढत कशी आहे ? याचा अर्थ हे असत्य आहे. पण आपला बहुजन समाज या सर्व गोष्टीची चिकित्सा करीत नाही तोपर्यंत हे चालूच राहणार आहे. आणखी एक महत्वपूर्ण बाब म्हणजे हिंदू धर्मवाले सांगतात की, माणसाचा किंवा या पृथ्वीवरील प्रत्येक जीवाचा जन्म हा परमेश्वराच्या हातत आहे मग कांही प्रश्न चिकित्सा केल्यावर मनात येतात की, जेंव्हा पुरुष किंवा स्त्री यांची मूल होऊ नये म्हणून नसबंदी केली जाते तेंव्हा जन्म होण्याचे कोण थांबवतो ? माणूस की देव ? याचा विचार केला तर आपल्या लक्षात येईल की, हा सिद्धान्त खोटा ठरतो. दुसरे म्हणजे कांही कारणाने समाजात खून होतात मग या माणसाचा मृत्यू कोणी घडवून आणला ? आणि जर माणसाने मृत्यू घडवून आणला असेल तर मग पुन्हा एक तत्व खोटे सिद्ध होते की, या पृथ्वीवरील सर्व घटनेला ईश्वर जबाबदार आहे कसा ? मग एखाद्या चांगल्या माणसाचा खून का होतो जर तो ईशवराच्या मर्जीने होत असेल तर उलट अशी माणसे जास्त वर्ष जगली पाहिजे त्याची समाजाला जास्त आवश्यकता असते उदा: इंदिरा गांधी , राजीव गांधी ,महात्मा गांधी , डॉ. नरेंद्र दाभोळकर , गोविंद पानसरे , कलबुर्गी , गौरी लंकेश आणि आपले देशासाठी शहीद होणारे अनेक सैनिक या सर्व लोकांची देशाला जास्त आवश्यकता आहे मग हे ईश्वराच्या मर्जीने का मारले जातात ? हा मूलभूत प्रश्न आहे. याचा अर्थ सरळ आहे की, या पृथ्वीवर कोणी जन्म घेतो किंवा मृत्यू पावतो या घटना कोणी ईश्वर घडवून आणत नाही तर त्या नैसर्गिक घडतात किंवा मानव घडवून आणतो. खरे तर मानवानेच त्याची गरज म्हणून ईश्वर निर्माण केला आहे. म्हणूनच आपल्या पुरोगामी संतांनी म्हटले आहे की, दगडाचा देव केला त्याचा बाप वडार झाला, सोन्याचा देव केला त्याचा बाप सोनार झाला आणि मातीचा देव केला त्याचा बाप कुंभार झाला. आणि बरोबर आहे की, यात कोणी देव पहिला आहे ? तर कोणीच नाही हे सारे एक कल्पना म्हणून होत आहे. म्हणजे साधी गोष्ट आहे की, मूर्तीकला कधी विकसित्त झाली ? आणि देवाची निर्मिती कधी झाली ? याचा विचार केला तर मानवाला जर कोणतीच कला किंवा शिक्षण नव्हते तेंव्हा हे सर्व देव मानले गेले आहेत मग या सर्व कला म्हणजे फोटो , शिल्पकला या आताच्या आहेत मग देव कोणी निर्माण केले तर माणसाने हा साधा सिद्धान्त आहे. म्हणून आपले महाराष्ट्रातील थोर साहित्यिक मा. बाबुराव बागूल माणसाचे महत्व सांगताना म्हणतात ,



प्रा.डॉ.आर.जे. इंगोले
मो.नं.९४२३१८०८७६

**वेदाआधी तू होतास, वेदाच्या परमेश्वराआधी**
**तू होतास,**
**पंचमहाभूतांचे पाहून विराट , विक्राळ रूप**
**तू व्यथित, व्याकूळ होत होतास, आणि हात**
**उभारून तू**
**याचना करीत होतास, त्या याचना म्हणजे**
**ऋचा**
**सर्व ईश्वरांचे जन्मोत्सव तूच साजरे केलेस,**
**सर्व प्रेषितांचे बारसेही,**
**तूच आनंदाने साजरे केलेस.**
**हे माणसा , तूच सूर्याला सूर्य म्हटलेस, आणि**
**सूर्य, सूर्य झाला,**
**तूच चंद्राला चंद्र म्हटलेस, आणि चंद्र, चंद्र**
**झाला**
**अवघ्या विश्वाचे नामकरण तू केलेस**
**अन प्रत्येकाने मान्य केले,**
**हे प्रतिभावान माणसा, तूच**
**आहेस सर्व काही,**
**तुझ्यामुळेच संजीव सुंदर**
**झाली ही मही.**

या कवितेत कवी मा. बाबुराव बागूल यांनी या धरणीवर मानव हा सर्वश्रेष्ठ आहे. आणि त्यानेच हे सर्व निर्माण केले , त्यानेच या सूर्य आणि चंद्र यांना ओळख दिली याचा अर्थ मानव या सर्व पृथ्वीचा निर्माता आहे. आणि या पृथ्वीवर जे जी आजपर्यंत निर्माण झाले आहे त्याला कारणीभूत हाच मानव आहे. पण आपल्याकडे मानवाला कमी लेखले जाते आणि सर्व काल्पनिक बाबीकडे लक्ष दिले जाते. यामुळे मानवाचे महत्व कमी कमी होत आहे. आणि ते होऊ नये म्हणून आपण आता काळजी घेणे जास्त गरजेचे आहे. आपल्या बहुजन समाजाला देव, स्वर्ग, नर्क, आत्मा-परमात्मा, पुनर्जन्म या कल्पनिक बाबी सांगून हे आपला स्वार्थ अनेक वर्षापासून साध्य करीत आहेत. आणि आपले भोळे बहुजन आपल्या भावी पिढीचे नुकसान करून यांचे भले करीत आहेत. आपल्याला अनेक देवी आणि देवता यांची भीती दाखवून आर्थिक शोषण केले जाते याचे आकडे सोशल मीडियावर आले आहेत ते भयंकर आहेत. याचा विचार आपल्या बहुजन समाजाने गांभीर्याने करावा आणि आजपर्यंत जे झाले ते झाले पण इथून पुढे तरी आपल्या भावी पिढीचे नुकसान करू नये. एक माहिती पुढे आली आहे की, यात असे म्हटले आहे की, मंदिरो मे दान देने का मतलब है आपने खुद के लिए दुश्मन तयार करना. आणि मग पुढे यात जी आर्थिक विषयी माहिती आली आहे ती धक्कादायक आहे ती अशी की, - भारत मे लगभग १,१६००० मंदिर रजिष्टर है । गली कुचे मे तो अनगिनत मंदिर पडे है । भारत मे लगभग १०० करोड डउ,डढ,जइउ है । प्रत्येक डउ,डढ,जइउ यदि औसतन ५०० रुपये भी साल मे धर्म के नाम पर देता है तो यह राशि ५०,००० करोड होती है । इतनी राशि का यादि डउ,डढ,जइउ शिक्षा कोश बना ले हर वर्ष ५,००००० डॉक्टर, इंजिनीअर या ऐसे ही प्रोफेशनल कोर्सेस की अपने बच्चों की, फिस हमारे लोग भर सकते है । क्या कोई देवता या धर्म अपकी इतनी बडी मदत कर सकता है ? या मेसेजचा पण जरा गांभीर्याने विचार केला तर आपल्या लक्षात येईल की, आपण आपल्या कित्येक पीढयांचे किती भयंकर नुकसान केले आहे. आणि याचे कारण पुन्हा तेच आहे की, आपल्याला अनेक काल्पनिक गोष्टीची विनाकारण भीती दाखवून आपली दिशाभूल केली. आज आपले तरुण कावड यात्रा ,पदयात्रा, जनआक्रोश मोर्चे यात अडकवू ठेवले जात आहेत. आणि यांची मुले विदेशात उच्च शिक्षण घेऊन त्यांचे करियर बनवत आहेत. पण आपल्या बहुजन समाजाला कधी समजणार आहे ? आपले अनेक महापुरुष आपणास योग्य मार्ग दाखवून गेले आहेत आणि आज सुद्धा अनेक विचारवंत हे काम करीत आहेत पण आपला समाज काही जागा होत नाही. आपल्याला कसे फसविले जाते आणि भावनिक करून आपला गैरवापर कसा होतो याचे साधे उदाहरण आहे. आताच एक यवतमाळ येथील व्हिडिओ सोशल मीडियावर आला होता की, एक बाबा हिंदू जन-आक्रोश मोर्चात लोकांना सांगत आहे की, हिंदू धर्मासाठी एक व्हा , आता घरातील हत्यार बाहेर काढा आणि प्रसंगी आपल्या हिंदू धर्मासाठी वेळ पडली तर जेलमध्ये जा किंवा शहीद व्हा आता हे सर्व खोटे आहे. आणि आपल्याला भावनिक भडकावून आपला वापर केला जात आहे पण जरी आपण एका मिनिटासाठी हे खरे आहे असे समजू आणि हिंदू लोकांनी एक झाले पाहिजे हे सर्व सत्य आहे तर या मोर्चातील कांही लोकांनी या बाबाला एक साधा प्रश्न विचारायचा किंवा एक अट घालायची की, बाबा आम्ही तयार आहोत पण आमची एक अट आहे की, या लढाईत जो धडा आपल्या विरोधकांना द्यायचा आहे या लढाईत तुम्ही सर्वात पुढे या हत्यार घेऊन आणि दुसरे तुमचे जर कोणी मुले असतील तर त्यांना आमचे नेते करा म्हणजे त्यांना सर्वात पुढे करा आम्ही तयार आहोत ही लढाई करायला. असे तुम्ही म्हणाल ना तेंव्हा फक्त तुम्ही त्या बाबाचा चेहरा बघा त्या बाबाला घाम फुटेल आणि तो तिथून काहीतरी कारण सांगून निघून जाईल. आणि आज आपणास जागृत होण्याची आणि असे प्रश्न विचारण्याची गरज आहे. आपले अनेक पिढयांचे नुकसान झाले आहे पण आता भूतकाळ तर आपल्या हातात नाही पण पुढील काळ तर आहे ना ! मग आताच जागे व्हा आणि आपल्या तरुण पिढ्यांना सुद्धा हा विचार सांगा. यालाच संस्कार म्हणतात ही आता नाविन आणि खरी व्याख्या संस्काराची आपल्याला करावी लागेल आजपर्यंत आपल्याला चुकीची व्याख्या सांगितली होती की, बाबा ,बुवा आणि हे कथावाले यांच्या कथा ऐकणे म्हणजे संस्कार आहे पण हे खोटे आहे ही सर्व आर.एस.एस. चे कार्यकर्ते आहेत. त्यांनी अनेक काल्पनिक बाबी आपल्या समाजाला सांगून भीती निर्माण केली आहे. मागे एक बाबा सांगत होता की, विद्यार्थी परीक्षेला जात असतांना सोबत एक झाडाचे पान ठेवले तर अभ्यास करण्याची आवश्यकता नाही. आता या आधुनिक युगात हे कसे शक्य आहे ? पण आपल्या बहुजन मुलांना अंधश्रद्धामध्ये अडकवून आपल्याला शिक्षणापासून दूर करून एक दैववादी पिढी निर्माण करण्याचा हा भटी डाव आहे हे लक्षात ठेवा. म्हणून आपण दैववादी होण्यापेक्षा प्रयत्नवादी झाले पाहिजे.

# आरक्षणाचे उप-वर्गीकरण: सामाजिक न्यायाची मशाल

भारतीय संविधानाच्या पवित्र गाभाऱ्यात जेव्हा 'सामाजिक न्याय' हा शब्द कोरला गेला, तेव्हा तो केवळ एक वैधानिक शब्द नव्हता, तर तो पिढ्यानपिढ्या अस्पृश्यतेच्या, अपमानाच्या आणि अमानवीयतेच्या जळत्या निखाऱ्यांवरून चालणाऱ्या कोट्यवधी पावलांसाठी एक शीतल सावली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जेव्हा आरक्षणाचे शस्त्र उपसले, तेव्हा त्यांचा मूळ हेतू हा होता की, समाजात जो घटक सर्वात तळाला आहे, ज्याचा आवाज वेशीबाहेरही ऐकला जात नाही, त्याला लोकशाहीच्या मुख्य प्रवाहात मानाचे स्थान मिळावे. मात्र, स्वातंत्र्याच्या अमृतकाळातही जेव्हा आपण मागे वळून पाहतो, तेव्हा असे दिसते की आरक्षणाच्या या महावृक्षाची फळे काही मोजक्याच फांद्यांनी चाखली, तर अनेक मुळे आजही जमिनीखाली पाण्याच्या एका थेंबासाठी आसुसलेली आहेत. आरक्षणाचे उप-वर्गीकरण हा केवळ प्रशासकीय निर्णयाचा भाग नाही, तर तो या विशाल महावृक्षाच्या सावलीचे न्याय्य वाटप करण्याचा एक महान सामाजिक आणि मानवी दस्तऐवज आहे, ज्याची प्रतीक्षा शतकांपासून उपेक्षित राहिलेल्या डोळ्यांना होती.

अनुसूचित जातींच्या या विशाल आणि गुंतागुंतीच्या पटावर नजर टाकली, तर तिथे केवळ एक समाज दिसत नाही, तर तिथे दु:खाचे आणि संघर्षाचे वेगवेगळे स्तर दिसतात. या प्रवर्गातील काही जातींनी संघर्षाच्या जोरावर शिक्षणाची शिखरे पादाक्रांत केली, राजकीय सत्तेची फळे चाखली आणि स्वतःला प्रगत केले, ही निश्चितच आनंदाची बाब आहे. मात्र, याच प्रवर्गातील मातंग, वाल्मिकी, मादिगा, चर्मकार आणि अशा अनेक 'अति-मागास' जाती आजही त्याच काळोख्या कोठडीत बंदिस्त आहेत, जिथे प्रगतीचा सूर्यकिरण पोहचण्यासही बंदी आहे. जेव्हा आपण सर्वांना 'अनुसूचित जाती' या एकाच नावाखाली एकाच स्पर्धेच्या मैदानात उतरवतो, तेव्हा ज्यांच्याकडे आधीच थोडाफार आर्थिक आणि सामाजिक आधार आहे, तेच बाजी मारतात. यामुळे वंचितांमधील हा नवा शोषित वर्ग आरक्षणाच्या नावाखाली केवळ पोकळ स्वप्ने पाहत राहतो. उप-वर्गीकरण म्हणजे या वंचितांच्या डोळ्यांतील अश्रू पुसून त्यांच्या हातांत हक्काची भाकरी देणारा एक क्रांतीकारी बदल आहे, जो समतेच्या तत्त्वाला खऱ्या अर्थाने अर्थ प्राप्त करून देतो.

भावनिक दृष्टिकोनातून विचार केला तर, उप-वर्गीकरण म्हणजे एकाच कुटुंबातील अशा भावंडांचा विचार करणे आहे, ज्यातील एक धावू शकतो आणि दुसरा पायाने निकामी आहे. आई-वडील जसे अशक्त मुलाला जास्त घास भरवतात, तसाच हा प्रकार आहे. आरक्षणाचा हा घास आजवर कोणाच्यातरी ताटात जात होता, तर कोणीतरी केवळ ताटाकडे पाहत उपाशी झोपत होते. उप-वर्गीकरण ही या उपाशी पोटी झोपणाऱ्यांच्या न्याय्य हक्काची लढाई आहे. ज्या जाती आजही सफाई कामगार म्हणून मैला वाहण्याचे किंवा शेतमजुरीचे,झाडू बांधणीचे, दोरखंड वळण्याचे किंवा गावाखेड्यात निम्न दर्जाचे,अत्यंत कष्टाचे काम करत आहेत, ज्यांच्या घरांत आजही शिक्षणाचे पहिले पाऊल पडलेले नाही, अशा कुटुंबातील मुलाला जेव्हा जिल्हाधिकारी किंवा डॉक्टर बनण्याचे स्वप्न पाहायचे असते, तेव्हा त्याच्या समोर स्वत:च्याच प्रवर्गातील प्रगत जातींचे एक अभेद्य भिंत उभी असते. उप-वर्गीकरण ही भिंत पाडण्यासाठी नाही, तर त्या भिंतीच्या पलीकडे असलेल्या अंधारात प्रकाशाचा कवडसा नेण्यासाठी आहे, जेणेकरून त्या मुलालाही स्वत:च्या कर्तृत्वाने जग जिंकता येईल.

सामाजिक न्यायाच्या या नवीन मांडणीमुळे समाजात अंतर्गत संघर्ष निर्माण होईल, अशी भीती काही जण व्यक्त करत आहेत; पण वास्तव याच्या उलट आहे. अन्यायातून कधीही एकता निर्माण होत नसते. जेव्हा एकाच प्रवर्गातील एका जातीला सर्व काही मिळते आणि दुसरी जात केवळ नावाची 'आरक्षित' उरते, तेव्हा त्यांच्यात सुप्त द्वेष आणि अविश्वास निर्माण होतो. हा अविश्वास दलितांच्या सामूहिक ताकदीला वाळवीसारखा पोखरत असतो. उप-वर्गीकरणामुळे 'ज्याची जेवढी संख्या आणि जेवढे मागासलेपण, त्याला तेवढा वाटा' हे पवित्र सूत्र लागू होईल. जेव्हा प्रत्येकाला खात्री असेल की आपला वाटा कोणीही हिरावून घेणार नाही, तेव्हाच खऱ्या अर्थाने बंधुभाव निर्माण होईल. हा बदल 'जात तोडण्यासाठी' नसून 'न्याय जोडण्यासाठी' आहे. हे वर्गीकरण म्हणजे वंचितांच्या महासागरात स्वत:चे अस्तित्व हरवून बसलेल्या लहान लहान बेटांना एकत्र गुंफणारा एक प्रेमाचा आणि न्यायाचा पूल आहे, जो सामाजिक सलोख्याला नवी दिशा देईल.

राजकीय आणि घटनात्मक परिप्रेक्ष्यातून पाहिले तर, सर्वोच्च न्यायालयाने दिलेला हा कौल भारतीय लोकशाहीच्या प्रगल्भतेचे लक्षण आहे. डॉ. आंबेडकरांनी संविधानाद्वारे आपल्याला जी राजकीय लोकशाही दिली, तिचे उद्दिष्ट सामाजिक लोकशाही प्रस्थापित करणे हेच होते. सामाजिक लोकशाही म्हणजे जिथे प्रत्येक व्यक्तीला त्याच्या योग्यतेनुसार आणि गरजेनुसार संधी मिळते. उप-वर्गीकरण ही या सामाजिक लोकशाहीच्या दिशेने केलेली एक नैतिक दुरुस्ती आहे. हे केवळ काही टक्केवारीचे खेळ नाहीत, तर हे कोट्यवधी माणसांच्या जगण्या-मरण्याचे प्रश्न आहेत. जेव्हा एखादा अति-मागास समाजातील तरुण प्रशासकीय सेवेत जातो, तेव्हा केवळ एक व्यक्ती नोकरीला लागत नाही, तर त्याच्या संपूर्ण वस्तीचा आत्मविश्वास उंचावतो. तो तरुण त्या वस्तीसाठी एक दीपस्तंभ बनतो. उप-वर्गीकरणामुळे असे हजारो दीपस्तंभ महाराष्ट्राच्या आणि देशाच्या कानाकोपऱ्यात पेटले जातील, जे अज्ञानाचा आणि दारिद्र्याचा काळोख नष्ट करण्यास मदत करतील.



सुनिल सुतार
गेवराई जि. बीड
मो.नं. ९८८१९४२०००

उप-वर्गीकरण ही एक अशी कविता आहे जिचा प्रत्येक शब्द उपेक्षितांच्या वेदनेवर फुंकर घालणारा आहे. आजवर आपण आरक्षणाला केवळ एक आकडा म्हणून पाहिले, पण आता त्याला एक चेहरा देण्याची वेळ आली आहे. तो चेहरा त्या मायमाऊलीचा आहे जी आजही दुसऱ्याच्या शेतात घाम गाळतेय, तो चेहरा त्या बापाचा आहे जो आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी सावकाराचे उंबरठे झिजवतोय. उप-वर्गीकरणामुळे या चेहऱ्यांवर हास्य उमटेल. ही प्रक्रीया म्हणजे आरक्षणाचे विकेंद्रीकरण आहे. ज्याप्रमाणे धरणाचे पाणी केवळ मुख्य कालव्यालाच न मिळता ते शेवटच्या शेतापर्यंत पोहोचणे गरजेचे असते, त्याचप्रमाणे आरक्षणाचे लाभ केवळ शहरांतील प्रगत वस्त्यांपर्यंत न राहता ते खेड्यापाड्यांतील दुर्लक्षित झोपड्यांपर्यंत पोहोचले पाहिजेत. हेच समतेचे आणि न्यायाचे खरे स्वरूप आहे, ज्याची मांडणी ज्योतिबा फुले आणि राजर्षी शाहू महाराजांनी केली होती.

प्रशासकीय पारदर्शकता आणि अचूक आकडेवारी हा या उप-वर्गीकरणाचा आत्मा असावा लागेल. केवळ भावनेच्या भरात हा निर्णय घेण्यापेक्षा, शास्त्रीय आधारावर कोणत्या जातीला किती मदतीची गरज आहे, हे सरकारने स्पष्ट करणे आवश्यक आहे. अनेक जाती अशा आहेत ज्यांचे नाव केवळ कागदोपत्री शिल्लक राहिले आहे, पण प्रत्यक्ष जीवनात त्यांचे अस्तित्व नगण्य आहे. उप-वर्गीकरण करताना अशा 'अदृश्य' जातींना शोधून त्यांना आरक्षणाच्या पहिल्या रांगेत बसवणे ही ऐतिहासिक गरज आहे. हे करत असताना कोणत्याही प्रकारचा राजकीय स्वार्थ किंवा 'फोडा आणि राज्य करा' ही नीती न वापरता, केवळ आणि केवळ मानवी हक्कांचा विचार केला गेला पाहिजे. जर हा निर्णय प्रामाणिकपणे अमलात आणला गेला, तर येणाऱ्या दशकात भारताच्या सामाजिक रचनेत एक सकारात्मक आणि हृदयस्पर्शी बदल पाहायला मिळेल, जिथे संधीचे द्वार प्रत्येकासाठी सारख्याच उंचीवर असेल.

तथापि, हे उप-वर्गीकरण म्हणजे मूळ आरक्षणाला छेद देणे अजिबात नाही, हेही लक्षात घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. काही हितसंबंधी गट असा अपप्रचार करत आहेत की यामुळे दलित एकता धोक्यात येईल. पण खरे तर, जेव्हा कुटुंबातील सर्वात लहान आणि कमकुवत मुलाला ताकद मिळते, तेव्हा संपूर्ण कुटुंब मजबूत होते. उप-वर्गीकरण हे अनुसूचित जातींच्या अंतर्गत असलेल्या विषमतेच्या जखमेवर लावले जाणारे एक मलम आहे. ज्यांना आजवर आरक्षणाच्या नावाखाली केवळ उपेक्षा मिळाली, त्यांना आता स्वतःचे हक्क मागण्यासाठी कोणासमोर हात पसरण्याची गरज उरणार नाही. हे आत्मबळ मिळवून देणे, हेच तर संविधानाचे अंतिम उद्दिष्ट होते. म्हणून, या निर्णयाकडे केवळ आकड्यांच्या चष्म्यातून न पाहता, त्याकडे एका सामाजिक क्रांतीच्या नजरेतून पाहिले पाहिजे, जी क्रांती रक्ताविना पण न्यायाच्या सामर्थ्याने घडणार आहे.

शेवटी, आरक्षणाचे उप-वर्गीकरण हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'अंतिम माणसाचा विकास' या संकल्पनेला दिलेली एक मानवंदना आहे. हे पाऊल आरक्षणाची व्याप्ती वाढवून ते खऱ्या गरजवंतांपर्यंत पोहोचवण्याचा एक धाडसी प्रयत्न आहे. ज्याप्रमाणे एखादा शिल्पकार दगडातून मूर्ती घडवताना अनावश्यक भाग काढून टाकतो आणि त्यातील सौंदर्याला वाट करून देतो, त्याचप्रमाणे आरक्षणाच्या सध्याच्या रचनेतील त्रुटी दूर करून ती अधिक न्यायसंगत बनवणे, हेच या प्रक्रियेचे सार आहे. जेव्हा समाजातील सर्वात दुर्बल घटक, ज्याला आपण 'दलित' म्हणतो, त्यातीलही सर्वात शोषित भाग जेव्हा ताठ मानेने समाजात वावरू लागेल, तेव्हाच खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य आणि समता सार्थ ठरेल. हे उप-वर्गीकरण म्हणजे केवळ एक सरकारी आदेश नाही, तर तो कोट्यवधी उपेक्षितांच्या स्वप्नांना मिळालेला आधार आहे.

आपण एका अशा वळणावर उभे आहोत जिथे आपल्याला जुन्या चौकटी मोडून नव्या न्यायाची स्थापना करायची आहे. आरक्षणाचे उप-वर्गीकरण हा बदल स्वीकारणे म्हणजे सामाजिक सत्याला सामोरे जाणे होय. हा बदल केवळ सत्तेचे किंवा नोकरीचे गणित नाही, तर तो एका नव्या, सर्वसमावेशक आणि संवेदनशील भारताच्या निर्मितीचा पाया आहे. ज्या दिवशी एका सफाई कामगाराचा मुलगा किंवा एका भूमिहीन मजुराची मुलगी उप-वर्गीकरणामुळे मिळालेल्या संधीतून देशाच्या सर्वोच्च पदावर बसेल, त्या दिवशी खऱ्या अर्थाने बुद्ध आणि आंबेडकरांचा भारत साकार झालेला असेल. ही केवळ आशा नाही, तर तो एक निर्धार आहे, जो आपल्याला समतेच्या एका नव्या क्षितिजाकडे घेऊन जाणार आहे. जिथे न्याय हा केवळ शब्दांत नसेल, तर तो प्रत्येकाच्या आयुष्यात आणि प्रत्येकाच्या ताटात असेल. हीच सामाजिक न्यायाची खरी आणि अंतिम व्याख्या आहे.

# लातूर जिल्ह्यात ९८९ रुग्णांना सुमारे ७.७२ कोटींची मदत

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आरोग्यसेवेला गती**

**लातूर । प्रतिनिधी**

शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. लातूर जिल्ह्यात आर्थिक वर्षात ९८९ रुग्णांना सुमारे ७ कोटी ७२ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरित्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.

**२० गंभीर आजारासाठी मदत**

कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस,



कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.

**सामंजस्य करारातून मदतीचा मार्ग मोकळा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.

**आर्थिक वर्षातील मदत**

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत लातूर जिल्ह्यातील ९८९ रुग्णांना सुमारे ७ कोटी ७२ लाख ९५ हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील नेतृत्वातून आणि दूरदृष्टीतून लातूर जिल्ह्यातील शेकडो गरजू रुग्णांना वेळेवर वैद्यकीय मदत मिळत आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या पारदर्शक आणि गतिमान कार्यपद्धतीमुळे मदत वितरणाचा वेग वाढला असून अनेक कुटुंबांना दिलासा मिळाला आहे. कोणताही रुग्ण उपचाराअभावी वंचित राहू नये, हा निर्धार आहे. अधिक माहितीसाठी व सहाय्यासाठी १८०० १२३ २२११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख

# औसा गट विकास अधिकारी नरेगाच्या ईकेवायसीसाठी फिल्डवर

**औसा । बी.डी. उबाळे**

तालुक्याचे कर्तव्यदक्ष गट विकास अधिकारी आनंद मिरगणे हे ई केवायसी काम करण्यामध्ये काय अडचणी येत आहेत? या जाणून घेण्यासाठी म्हणजे काम करणाऱ्याच्या मुळाशी जाऊन त्यांनी कामाचा आणि प्रत्यक्ष होणाऱ्या अडचणींचा अनुभव घेतला. याच दरम्यान त्यांनी भादा, समदर्गा सह इतर गावांमध्ये दौरा करून भेटतील त्या रोजगार हमी योजनेतील लाभार्थींचे आणि जॉब कार्ड धारकांचे ईकेवायसी करण्याचा प्रयत्न केला. असाच प्रयत्न करीत असताना संमदर्गा तालुका औसा येथे गट विकास अधिकारी स्वतः ईकेवायसी करीत असताना दिसत आहेत.



यावेळी संमदर्गा येतील ग्रामरोजगार सहाय्यक गोविंद शिंदे, तांत्रिक अधिकारी नितीन चव्हाण आणि इतर नागरिक दिसत आहेत. यामुळे प्रत्येक गावातील रोजगार सहाय्यक यांनी आपल्या गावातील ईकेवायसी संदर्भात दक्ष राहून ईकेवायसी चे प्रमाण ९० ते ९५ टक्के पेक्षा अधिक काम पूर्ण करावे अशा सूचना शासन स्तरावरून ग्राम रोजगार सहाय्यकांना वारंवार दिल्या जात आहेत. परंतु सदरील काम करीत असताना कधी नेटवर्कची अडचण तर कधी लाभधारक भेटत नाहीत, काही लाभधारक ईकेवायसी करण्यास नकार देतात, काहींचे आधार अपडेट नाहीत अशा विविध समस्यांना तोंड देण्याचे काम सध्या ग्राम रोजगार सहायकांनाच करावे लागते. त्यामुळे या कामामध्ये अडचण निर्माण होऊन काम गतिमान होत नाही ते कासव गतीने होताना तालुक्यामध्ये दिसून येत आहे. तसेच ग्राम रोजगार सहाय्यकांचा महाराष्ट्र भर संप सुरू असलेल्या या संपामध्ये इतर कर्मचारीही यांच्याकडूनही पाठिंबा दिला जात असल्याचे समजते.

# विविध मागण्यांसाठी २१ एप्रिलपासून बेमुदत संप

## महसूल कर्मचाऱ्यांचा सक्रिय सहभाग; उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन सादर

**उदगीर । पाटील मनेश**

सरकारी निमसरकारी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समिती, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने विविध प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी दि. २१ एप्रिल २०२६ पासून बेमुदत संप पुकारण्यात आलेला आहे. या समन्वय समितीचा महसूल विभाग हा एक महत्त्वाचा घटक असल्याने महसूल विभागातील कर्मचारी देखील सदर संपामध्ये सक्रियपणे सहभागी झालेले आहेत.




सदर संपाच्या पार्श्वभूमीवर उपविभाग उदगीर तर्फे मा. उपविभागीय अधिकारी श्री. सुशांत शिंदे यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. समन्वय समितीच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत. जुनी पेन्शन योजना तात्काळ लागू करण्यात यावी. वाहन चालक व शिपाई भरतीवरील बंदी तात्काळ उठवण्यात यावी. सर्व सरकारी कर्मचारी, निवृत्तीवेतनधारक तसेच कंत्राटी/रोजंदारी कर्मचाऱ्यांना शासकीय व मान्यताप्राप्त रुग्णालयांमध्ये कॅशलेस उपचार सुविधा उपलब्ध करून द्यावी. सलग दहा वर्षे सेवा करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम सेवेत समाविष्ट करण्यात यावे. कर्तव्य बजावत असताना अधिकारी व कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या हल्ल्यांविरोधात कडक कारवाई करण्यासाठी अजामीनपात्र कायद्याची तरतूद करण्यात यावी. यावेळी लातूर जिल्हा संघटक श्री. सुग्रीव बिरादार, उदगीर तालुका महसूल कर्मचारी संघटनेचे तालुका अध्यक्ष श्री. विजयकुमार हंदेश्वर, तालुका उपाध्यक्ष श्री. विशाल कदम, तालुका सचिव श्रीमती विद्या पवार यांच्यासह ओमप्रकाश मानकोसकर, छगनलाल भन्साळी, प्रशांत शिवाळे, राऊफ शेख, सतीश मोरे, रमेश पाटणकर, रघुनाथ पाटील, राजकुमार स्वामी, सचिन स्वामी, कविता भांजे, श्रीजीत डोके, उर्मिला तिडके, प्रीतम पाटील, सय्यद उमर आदी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. समन्वय समितीने शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.




# मानवतावादी विचाराची पेरणी महात्मा बसवेश्वरांनी केली : प्रा.शिवकुमार ऊस्तुर्गे

**उदगीर । पाटील मनेश**

बाराव्या शतकात अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये महात्मा बसवेश्वरांनी धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रामध्ये सुधारणा केली. जात, वर्ण पाहून माणसाचे मूल्यमापन करू नये. जातीपेक्षा पात्रता महत्त्वाची असते, असे सांगत परंपरेने चालत आलेल्या सर्व कुप्रथा, कर्मकांड, रुढींना बसवेश्वरांनी छेद दिला. एक अर्थाने महात्मा बसवेश्वरांनी मानवतावादी विचारांची पेरणी केली. असे विचार समाजशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.शिवकुमार उस्तुर्गे यांनी व्यक्त केले.

श्री हावगीस्वामी महाविद्यालयात वार्षिक नियोजन समिती व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त आयोजित व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.ए.ए. काळगापुरे, उपप्राचार्य डॉ. एन.जो.एमेकर, प्रमुख वक्ते समाजशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.शिवकुमार उस्तूर्गे व सत्कारमूर्ती प्रा.मनोहर भालके उपस्थित होते.

पुढे बोलताना प्रा.उस्तुर्गे म्हणाले, महात्मा बसवेश्वरांनी आंतरजातीय विवाह लावून वर्ण व जाती व्यवस्थेला नकार दिला. प्रथमतः महिलांना समानतेची वागणूक दिली. इष्टलिंगाच्या माध्यमातून एकेश्वरवादाचा पुरस्कार त्यांनी केला, असे सांगत कायक, दासोह या संदर्भात त्यांनी विस्ताराने भाष्य केले. परमपूज्य डॉ.बसवलिंग पट्टदेवरू यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त महाविद्यालयातील प्रा.मनोहर भालके यांचा भालकी हिरेमठ संस्थानच्या वतीने आदर्श शिक्षक म्हणून पुरस्कार देऊन गौरव केल्याबद्दल महाविद्यालयात त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी त्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. ए.ए.काळगापुरे म्हणाले, महात्मा बसवेश्वरांनी समाजाला नवी दिशा दिली. नैतिक मूल्य समाजात रुजविण्याचे काम केले. प्रामाणिकपणे केलेले कर्म हाचं स्वर्ग आणि देव आहे. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वार्षिक नियोजन समितीचे प्रमुख डॉ. म.ई.तंगावार तर आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. धनराज बंडे यांनी मानले.

# भादा येथील आनंदनगर जि प शाळेचा प्रवेशोत्सव दिन उत्साहात साजरा

**औसा । बी.डी. उबाळे**

तालुक्यातील भादा येथील जिल्हा परिषद प्रशाला आनंदनगर या ठिकाणी मोठ्या उत्साहात प्रवेशोत्सव दिन साजरा करण्यात आला. यावेळी शाळेमधून छोटेसे ट्रॅक्टर द्वारे रॅली काढून हा प्रवेशोत्सव दिन सोमवार दिं २० एप्रिल २०२६ रोजी आनंद नगर भागातील मुख्य रस्त्यावर फिरून आपली मुले शाळेत पाठवा, सहा वर्षे वयाची मुले शाळेत पाठवा अशा घोषणाबाजीसह संदेश देऊन शिकाल तर तिकाल!! अशा विविध घोषणासह ही रॅली काढण्यात आली. या यादीमध्ये आज रोजी नऊ पहिलीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. त्यानंतर शाळेमध्ये त्यांचे पुष्पहार घालून, पुष्प गुच्छ देऊन स्वागत करून त्यांचे तोंड गोड करण्यात आले. आणि हा प्रवेशोत्सव दिन शिक्षक



शालेय समितीचे अध्यक्ष श्रीधर बनसोडे, माजी अध्यक्ष सुनील गिरी, व्हा चेरमन महेश गायकवाड, गोपाळ पांनढवळे, दत्ता चांबारगे मुख्याध्यापक चव्हाण ईलासबाई, श्रीमती कानडे संगिता, कदम बालाजी, लोकरे शरद, जाधव राजू, पिचारे चंद्रकांत, श्रीमती विभूते अनुसया आदी शिक्षक आणि गावकऱ्यासह उपस्थित राहून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

# शंकरराव चव्हाण महाविद्यालयात पदवी परीक्षा सुरळीत

**अर्धापूर । प्रतिनिधी**

येथील श्री शारदा भवन शिक्षण संस्था, नांदेड संचलित शंकरराव चव्हाण महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या उन्हाळी परीक्षा (२०२६) महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.अजय टेंगसे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरळीत पार पडत आहेत. त्यासाठी अंतर्गत दक्षता पथकाची स्थापना करण्यात आली आहे.

सीसी टी.व्ही. कॅमेराच्या नजरेत कापीमुक्त वातावरणात परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी परीक्षा केंद्र प्रमुख डॉ.ल.ना.वाघमारे, संयुक्त परीक्षा केंद्र प्रमुख संत गाडगे महाराज महाविद्यालय, लोहा येथील प्रा.डॉ.साहेबराव मलदोडे, सहाय्यक परीक्षा केंद्रप्रमुख डॉ.मंगेश पोतंगले, डॉ.विशाल मस्के कार्यरत आहेत. कार्यालयीन कर्मचारी श्री अरविंद जामगे, श्री मारुती शिंदे, श्री राजाराम बुरकुले, श्री बालाजी पंदीलवाड, श्री बालाजी कवठेकर हे परीक्षेचे काम पहात आहेत. तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभत आहे.

# तत्त्वनिष्ठ नेतृत्व हरपले : डॉ. गोपाळराव पाटील यांच्या निधनाने शिक्षण, समाजकारण व वैद्यकीय क्षेत्राची मोठी हानी

**लातूर । संतोष सोनवणे**

महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक आणि वैद्यकीय क्षेत्रात समर्पण भावनेने आयुष्य वेचणारे माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील यांचे निधन झाल्याची बातमी अत्यंत दुःखद असून, त्यांच्या जाण्याने एक तत्त्वनिष्ठ संस्थाचालक, आदर्श राजकारणी आणि ज्येष्ठ बालरोग तज्ञ हरपला आहे. डॉ. पाटील यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात समाजाच्या उन्नतीसाठी अहोरात्र कार्य केले. तत्त्वनिष्ठता, ध्येयवादी विचार आणि सेवाभाव या गुणांमुळे ते एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जात होते. बालरोग तज्ञ म्हणून त्यांनी असंख्य बालकांना नवे जीवन दिले, तर राजकारणी म्हणून समाजहिताच्या अनेक उपक्रमांना चालना दिली.

लातूरच्या राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या माध्यमातून त्यांनी शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या दूरदृष्टीतून निर्माण झालेल्या 'लातूर पॅटर्न'मुळे देशभरात गुणवत्तापूर्ण शिक्षणाची नवी दिशा मिळाली. आज देशभरात कार्यरत असलेल्या अनेक डॉक्टर, इंजिनियर्स घडविण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. शिवछत्रपती शिक्षण संस्थेच्या उभारणीत त्यांनी अथक परिश्रम घेत, संस्थेला वटवृक्षासारखे विस्तारले आणि महाराष्ट्रातील एक आदर्श शिक्षणसंस्था म्हणून नावलौकिक मिळवून दिला. त्यांचे संपूर्ण जीवन हे तरुण पिढीसाठी प्रेरणादायी ठरले असून, त्यांनी जपलेले तत्त्वनिष्ठ विचार आणि कार्य पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

**– प्रा. बाबासाहेब सोनवणे, लातूर**

# कलंबर बु. येथील सार्वजनिक स्मशानभूमी रद्द करण्याची खेळाडूंची मागणी

**उस्माननगर । प्रतिनिधी**

येथील नवी आबादी परिसरातील गट क्रमांक ५५६ वरील सार्वजनिक स्मशानभूमी रद्द करण्यात यावी अशी मागणी तरूण व खेळाडू यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे दिलेल्या निवेदानातून मागणी केली आहे. कलंबर बु. ता.लोहा येथील नवी आबादी परिसरातील गट क्रमांक ५५६ मध्ये तरूणांसाठी याचबरोबर लहान मुलांना खेळण्यासाठी मैदान तयार केले आहे. त्याचबरोबर पदवीधर तरूणांना भरतीसाठी सराव करण्यासाठी सुसज्ज असे मैदान तयार केले आहे.

त्या जागेवर स्मशानभूमी तयार करण्यासाठी मोजमाप करण्यात आले आहे. सदर जागे लगत जिल्हा परिषद शाळा असून त्याच बाजूला वस्ती आहे. त्यामुळे शासकीय नियमानुसार तिथे स्मशानभूमीसाठी परवानगी देणे म्हणजे आयत्या पिठावर रागोळ काढणे होय. लहान मुलांना व उद्याचे स्वप्न उराशी बाळगून त्या मैदानावर भरतीसाठी सराव करण्यासाठी मैदान तयार केले आहे. आशा ठिकाणी स्मशानभूमी करणे हे लाजीरवाणी गोष्ट आहे. प्रस्तावित स्मशानभूमला गावातील तरूणांचा विरोध आहे. सदर गट क्रमांक ५५६ मधील खेळाच्या मैदानाची जागा स्मशानभूमी साठी दिल्यास भाकरीतील चंद्र शोधणाऱ्या नवीन पिढीतील युवकांना खेळाचे मैदान राहणार नाही, अशी मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांच्याकडे गावातील प्रविण कच्छवा, आकाश चंदेल, वैभव गुणावत, चंद्रकांत गुद्दे, अविनाश गोरे, दिनेश मेहर, पवन तरटे, केदार मुक्कनवार, सागर चंदेल, राज वाघमारे, आक्रम शेख, प्रफुल कांबळे, केशव शिराळे यांच्यासह अनेकांच्या स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

## देगलूर तालुक्यातील अवैध रेती उत्खनन प्रकरण

# उच्चस्तरीय विशेष चौकशी समितीची मागणी

**मनसेचे मनमत परबते यांचा आमरण उपोषणाचा इशारा**

**नांदेड । प्रतिनिधी**

देगलूर तालुक्यातील अवैध रेती- मुरूम उत्खनन व वाहतूकीस थांबविण्यास कर्तव्यात कसूर करून रेती माफीयांना सहकार्य करणारे महसूल प्रशासन व पोलीस प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय विशेष समितीमार्फत चौकशी करण्यात यावी या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष मनमत परबते यांनी विभागीय आयुक्त कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. देगलूर तालुक्यामध्ये मागील काही काळापासून मोठ्या प्रमाणामध्ये अवैध रेती मुरूम उत्खनन व वाहतूक सुरू आहे. याबाबत वरिष्ठ पातळीवर वारंवार तक्रार व कारवाई करण्याची मागणीसाठी पाठपुरावा करून देखील कोणत्याही प्रकारची ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. याउलट तक्रारदार मनमत परबते यांचेवर देगलूर पोलीस निरीक्षक मारुती मुंडे यांनी तहसीलदार भरत सूर्यवंशी, उपविभागीय अधिकारी अनुप पाटील यांच्याशी संगणमत करीत खोटे गुन्हे दाखल केल्याचे सांगितले आहे.

मराठवाड्याचे विभागीय आयुक्त यांना दिलेल्या निवेदनामध्ये परबते यांनी देगलूर पोलीस ठाण्यातील शिपाई रणजीत मुदीराज यांचेमार्फत हप्ते वसुली करण्यात येत असल्याचा आरोप केला आहे. तसेच रेती व मुरूम माफिया जाफरखान, जावेद खान, सुलतान बिस्मिल्ला खुर्शीद, मनदीपसिंघ, शेख जुनेद, अनिल हिमगिरे व देविदास कडलवार हे लोक अवैध रेती उत्खनन व वाहतूक करीत असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. या प्रकरणाची चौकशी स्वतंत्र व उच्चस्तरीय विशेष समितीमार्फत करून तक्रारदारास पोलीस संरक्षण द्यावे अशी मागणी केली आहे. अन्यथा बुधवार दि.२९ एप्रिल २०२६ पासून विभागीय आयुक्त कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

# लहान अर्धापूरजवळ कार आखाड्यात घुसली

**अर्धापूर । संजय पंडित**

तामसा ते नांदेड राष्ट्रीय महामार्गावर लहान अर्धापूरजवळील लोणी गावाजवळ दिनांक २० एप्रिल २०२६ रोजी दुपारी भीषण अपघात घडला. गोविंद महाराज भारती यांच्या आखाड्याजवळ असलेल्या आनंद वसंत भारती यांच्या आखाड्यात चालकाला झोप लागल्याने भरधाव कार थेट आखाड्यात घुसल्याची घटना घडली. या अपघातात दुपारच्या वेळी विश्रांतीसाठी बसलेल्या एका महिलेला गंभीर दुखापत झाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, मारुती सुझुकी (क्र.MH-26 K-3542) ही कार तामसा ते नांदेड मार्गावरून येत होती. लहान अर्धापूर परिसरात पोहोचल्यावर चालकाचा वाहनावरील ताबा सुटला. कदाचित चालकाला झोप लागल्याने कार रस्त्याच्या कडेला असलेल्या आखाड्यात शिरली. त्या वेळी शेतातील काम करून जेवणासाठी बसलेल्या महिलेला कारने धडक दिली. यात तिच्या डोक्याला व हाताला जबर मार लागला.

अपघातानंतर स्थानिकांनी तत्काळ मदत करून जखमी महिलेला जवळील खाजगी रुग्णालयात दाखल केले. तिच्यावर उपचार सुरू असून प्रकृती स्थिर असल्याचे समजते. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच अर्धापूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून पुढील कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. या अपघातामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. चालकाने वाहन चालविताना काळजी घ्यावी तसेच थकवा आल्यास विश्रांती घ्यावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

# नगराध्यक्ष भगवान दंडवे यांचा लिंगायत संघाकडून पुण्यात गौरव

**भोकर । प्रतिनिधी**

येथील नगरपरिषदचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष भगवान दंडवे यांचा राष्ट्रीय विरशैव लिंगायत संघाच्या वतीने रविवारी (ता.१२) पुणे येथे गौरव करण्यात आला. यावेळी समाजाच्या अनेक प्रमुख व्यक्तींची उपस्थिती होती. गेल्या तीन महिन्यापूर्वी राज्यात झालेल्या महानगरपालिका आणि नगरपरिषद निवडणूकीत अनेक ठिकाणी लिंगायत समाजाच्या प्रतिनिधींनी विजय मिळवला. समाजाप्रती असलेली आदरभावना व्यक्त करण्यासाठी महाराष्ट्र विरशैव लिंगायत संघाच्यावतीने पुणे येथील डेक्कन हार्डीकल हास्पीटल शिवाजीनगर येथे माजी मंत्री, आ. विजय देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील नवनियुक्त लोकप्रतिनिधींचा गौरव सोहळा घेण्यात आला.



यावेळी मान्यवरांच्या हस्ते भोकर येथील विरशैव समाजाचे जेष्ठ कार्यकर्ते व माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण यांचे खंदे समर्थक भगवानरावजी दंडवे हे भोकर नगराध्यक्षपदासाठी भरघोस मतांनी विजयी झाल्याने त्यांचा सन्मान चिन्ह, शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या सोहळ्यात राज्यातील विविध ठिकाणी विजय मिळवलेल्या ७७ नवनियुक्त लोकप्रतिनिधींचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

सदरील कार्यकमास माजी मंत्री तथा आमदार डॉ. विनय कोरे, भारत फोर्सचे अध्यक्ष बाबा कल्याणी, खासदार अजित गोपछेडे, खासदार डॉ. शिवाजी काळेगे, भाजपाचे संजय कौडगे, आमदार प्रवीण स्वामी, आमदार सचिन कल्याण शेट्टी, सौ. शिल्पा शशिकांत खोत, उद्योजक देवाभाऊ कोठुळे, डॉ. त्र्यबंक दापकेकर, संगमेश्वर बाचे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# महावितरणचा निष्काळजीपणा जीवावर बेतणार? बेलनगरकरांचा आंदोलनाचा इशारा!

**नांदेड । प्रतिनिधी**

पावसाळा उंबरठ्यावर असतानाही महावितरणच्या सुस्त कारभारामुळे नांदेडमधील बेलनगर परिसरातील नागरिक मृत्यूच्या छायेत वावरत आहेत. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने, आता संतापलेल्या रहिवाशांनी थेट रस्त्यावर उतरण्याचा पवित्रा घेतला आहे.

**धोकादायक स्थिती आणि 'शॉर्ट सर्किट'ची भीती**

बेलनगर दर्गा रोड मुख्य रस्त्यावरील विद्युत पोल धोकादायक रितीने वाकलेले असून वीजवाहक तारा जमिनीच्या दिशेने लोंबकलेल्या आहेत. पावसाळ्यात ओलावा निर्माण होऊन या तारांमुळे शॉर्ट सर्किट होण्याचा किंवा एखाद्या निष्पाप नागरिकाचा बळी जाण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. या तांत्रिक बिघाडामुळे परिसरातील वीजपुरवठाही वारंवार खंडित होत असून नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

**निधी मिळूनही कामे कागदावरच?**

विशेष म्हणजे, दरवर्षी शासनाकडून पावसाळापूर्व देखभाल व दुरुस्तीसाठी (मान्सूनपूर्व निधी) विशेष निधी उपलब्ध करून दिला जातो. असे असतानाही बेलनगरमधील हे प्रलंबित काम का केले जात नाही? असा संतप्त सवाल रहिवाशांनी उपस्थित केला आहे. वाकलेले पोल सरळ करणे आणि लोंबकणाऱ्या तारांची ओढ (ढशपीळेपळपस) व्यवस्थित करणे ही कामे प्राधान्याने करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

**८ दिवसांचा अल्टिमेटम!**

समस्त बेलनगरकर रहिवाशांनी सहाय्यक अभियंता, तरोडा उपविभाग यांना दिलेल्या निवेदनात स्पष्ट इशारा दिला आहे की: येत्या ८ दिवसांत दुरुस्तीच्या कामाला सुरुवात न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. या काळात कोणतीही अप्रिय घटना किंवा जीवितहानी झाल्यास त्याला पूर्णपणे महावितरण प्रशासन जबाबदार राहील. आता महावितरण प्रशासन या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन तत्काळ कार्यवाही करणार की एखाद्या दुर्घटनेची वाट पाहणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरण विरोधात लिंबागणेश येथे निदर्शने

**११ मे बीड मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन**

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

केंद्र व राज्य सरकारकडून अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा प्रस्ताव पुढे आल्याच्या पार्श्वभूमीवर आंबेडकरवादी समाज आक्रमक झाला असून लिंबागणेश येथे निदर्शने करण्यात आली. बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात भिम टायगर ग्रुपचे जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन पार पडले. सरकारकडून अनुसूचित जातीतील ५९ जातींचे अ, ब, क, ड अशा गटांमध्ये उपवर्गीकरण करण्याचा प्रस्ताव असल्याची माहिती समोर येत असून, या निर्णयामुळे समाजात फुट पडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. सामाजिक ऐक्य धोक्यात येईल, विविध घटकांमध्ये संघर्ष व अविश्वास वाढेल, अशी भीती आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. यावेळी सरकारविरोधात घोषणाबाजी करण्यात आली.

फडणवीस सरकारने नेमलेल्या न्या. अनंत बदर समितीचा अहवाल अद्याप सार्वजनिक न करता हरकती व सूचना मागवण्यात आल्यामुळे आंबेडकरी समाजात नाराजी असल्याचे निदर्शनास आले. समितीचा अहवाल तातडीने जाहीर करावा, तसेच उपवर्गीकरणाचा आधार व पद्धत स्पष्ट करावी, अशी मागणी करण्यात आली. निवेदन मंडळ अधिकारी उज्वला राऊत, सहाय्यक फौजदार विठ्ठल राठोड, पोलिस जमादार अविनाश घुंगरट यांच्या मार्फत जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना देण्यात आले.



या आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, राजेभाऊ गिरे, श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, लेनाजी गायकवाड, चेअरमन सुरेश निर्मळ, आरूण निर्मळ (उपाध्यक्ष आल इंडिया पँथर सेना बीड), औदुंबर थोरात, सुरज कदम, बाळकृष्ण थोरात, अमोल निर्मळ, दिनेश आवसरे, दादा थोरात, संदिप पवळ, रोहन आवसरे, सोनु पण थोरात, नितीन निर्मळ, बबलू थोरात, अक्षय थोरात, दिलीप ढास, तुकाराम गायकवाड, रिंकु निर्मळ, अंकुश गायकवाड, नामदेव थोरात, नामदेव आवसरे, संजय पावले गोवर्धन वाणी, केशव गिरे आदींसह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दरम्यान, अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण हे सत्ताधाऱ्यांचे 'फोडा आणि राज्य करा' धोरण आहे, असा आरोप करत डॉ. गणेश ढवळे यांनी ११ मे रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर आयोजित महामोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी पुढे सांगितले की, अनुसूचित जातींच्या १३ टक्के आरक्षणाचे अ, ब, क, ड असे उपवर्गीकरण अशास्त्रीय पद्धतीने राबवले जात असून यामुळे आरक्षणाच्या मूळ उद्दिष्टालाच धक्का बसू शकतो. हा विषय संसदेकडील अधिकारक्षेत्रात येतो, त्यामुळे राज्य सरकारचा हस्तक्षेप बेकायदेशीर ठरू शकतो.

न्या.अनंत बदर समितीने समाजातील घटकांशी पुरेशी चर्चा न करता अहवाल तयार केल्याचा आरोपही त्यांनी केला. सामाजिक न्याय, संविधानिक मूल्ये, समता व बंधुता टिकवण्यासाठी सर्व घटकांना न्याय मिळणे आवश्यक आहे. एका घटकाला न्याय देताना दुसऱ्यावर अन्याय होणार असेल, तर तो सामाजिक न्याय ठरू शकत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या विरोधात ११ मे रोजी बीड येथे होणाऱ्या महामोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी नागरिकांना केले आहे.

## दिव्यांगाचे दोन महिन्यापासून थकलेले अनुदान तात्काळ देण्यात यावे

**भूम । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य दिव्यांग संघटनेचे तहसीलदार जयवंतराव पाटील भूम यांच्या मार्फत दिव्यांग सक्षमीकरण आयुक्त साहेब पुणे, जिल्हाधिकारी धाराशिव, जिल्हा सक्षमीकरण अधिकारी धाराशिव यांना निवेदन देण्यात आले संजय गांधी संजय गांधी निराधार योजनेतून दिव्यांगांना दरम्यान अडीच हजार रुपये अनुदान दिले जाते परंतु दोन महिने झाले दिव्यांगाच्या खात्यावर पैसे जमा नसल्यामुळे दिव्यांगावर उपासमारीची वेळ आली आहे तरी साहेबांनी आपल्या तहसील कार्यालयामार्फत सदरील निवेदन दिव्यांग सक्षमीकरण आयुक्त साहेब पुणे व जिल्हाधिकारी धाराशिव व जिल्हा सक्षमीकरण अधिकारी धाराशिव, यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनावर खालील प्रमाणे सह्या आहेत महाराष्ट्र राज्य दिव्यांग संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप डोके, सचिव रियाज पठाण, राज्य समन्वयक रामहरी चव्हाण, बापूसाहेब मुळे, विश्वनाथ माळी, दादासाहेब डमरे, हनुमंत बोराडे, फयाज बेग, भाग्यश्री क्षिरसागर, रतन जाधव, सिंधूबाई टाळके, वैभव शेळवणे, शिवाजी शेटे, उत्तम बोटे, संतोष बोंद्रे, रमेश साठे, औदुंबर भारती, सुग्रीव शेटे समाधान भोरे, रत्नदिप चव्हाण, सागर झोंबाडे उपस्थित होते.



## पुस्तकांसमोर नतमस्तक व्हा, जग तुमच्यासमोर नतमस्तक होईल

### बीड जिल्हा रुग्णालयात बाबासाहेबांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

ज्ञान आणि कर्तृत्व असेल, तर जात-पात कोणीही पाहत नाही. तुम्ही उद्याचे भविष्य आहात, त्यामुळे नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून स्वतःच्या ज्ञानात भर घाला, असे प्रेरणादायी आवाहन बीडचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळुंके यांनी यावेळी बीड जिल्हा रुग्णालयात आयोजित डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सोहळा व संविधान सोहळ्याच्या निमित्त भावना व्यक्त केले.

संविधान फाउंडेशन, बीडच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून तथागत भगवान बुद्धांच्या चरणी अभिवादन करून सोहळ्याची सुरुवात करण्यात आली. यावेळी अध्यक्षीय भाषणात डॉ. सोळुंके यांनी रुग्णसेवेलाच खरी ईश्वरसेवा असल्याचे सांगत, महापुरुषांच्या विचारांवर चालून समाजासाठी योगदान देण्याचे आवाहन केले. डॉ. बाबासाहेब हे केवळ एका समाजाचे नाहीत, तर ते सर्वांचे प्रेरणास्थान आहेत, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. तर अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश चव्हाण यांनी बाबासाहेबांनी हिंदू कोड बिल आणि संविधानाच्या माध्यमातून महिलांना दिलेले हक्क व सुरक्षा कवचावर प्रकाश टाकला. अधिसेविका रमा गिरी यांनी बाबासाहेबांच्या संघर्षमय जीवनाचा आढावा घेत उपस्थितांना भारावून टाकले. समाजकार्यासाठी डॉ. पल्लवी पंडित यांचा विशेष गौरव करण्यात आला. तसेच, जुली रेड्डी यांच्या मुलाच्या स्मृतिप्रित्यर्थ मागील तीन वर्षांत आयोजित रक्तदान शिबिरात १४० हून अधिक विद्यार्थ्यांनी रक्तदान केल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीपाल ससाणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुनीता पाटील यांनी मानले.



यावेळी डॉ. नागेश चव्हाण, रमा गिरी, संगीता महानवार, सुनीता मिसाळ, मुक्ता पवार, प्रतीक जोशी, अजय ढाकणे आणि नर्सिंग कॉलेजचे विद्यार्थी-शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. संविधान फाउंडेशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

## संगीत खुर्चीत वंदना सोनवणे प्रथम; आंबेडकर जयंती स्पर्धेत सन्मानचिन्हाने सन्मानीत



**बीड । प्रतिनिधी**

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त कल्याण येथील सुभाष टेकडी लाल चौक येथे घेण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये संगीत खुर्चीत प्रथम क्रमांक पटवलेल्या वंदना सोनवणे यांना ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला.

सुभाष टेकडी लाल चौक परिसरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात संगीत खुर्ची, रस्सीखेच, वकृत्व स्पर्धा, गायन स्पर्धा आदी स्पर्धेचा आयोजन करण्यात आले होते. यामध्ये संगीत खुर्ची क्रीडा प्रकारात वंदना सोनवणे हिने प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या यशाबद्दल आयोजकाच्या वतीने ट्रॉफी देऊन तिचा सन्मान करण्यात आला. या यशाबद्दल त्यांच्या कुटुंबाने व मित्रपरिवाने त्यांना शुभेच्छा दिल्या व अभिनंदन केले. या वेळी संपादक उत्तम ओव्हाळ, बालासाहेब पणघुले, गोरख काळे, आकाश मस्के, नम्रता सोनवणे, यश कल्याण सोनवणे, गौतम ओव्हाळ, रितेश ओव्हाळ, बाबासाहेब खेमाडे व मित्र परीवार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोकप्रिय प्रसिद्ध कीर्तनकार वाणीभूषण ह.भ.प. बाळासाहेब महाराज शिंदे यांचे कीर्तन

**वडवणी/बीड । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव या ठिकाणी भारतरत्न विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त, दिनांक २४/४/२०२६ रोजी सायंकाळी ७ते १० या वेळेमध्ये महाराष्ट्रातील लोकप्रिय प्रसिद्ध कीर्तनकार वाणीभूषण, ह भ प बाळासाहेब महाराज शिंदे जालना यांचे कीर्तन होईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार यांनी केलेले कार्य ग्रामीण भागातील तळागाळातील सर्वसामान्य व्यक्तीकडे त्यांच्या या कार्याची जनजागृती व्हावी यावी यासाठी हरी कीर्तनाचा कार्यक्रम ठेवला आहे.



दिनांक २५/४/२०२६ रोजी सायंकाळी ५.ते १० या वेळे मध्ये डॉ,बाबासाहेब आंबेडकर चौक देवगाव ते अण्णाभाऊ साठे चौक या ठिकाणी डॉ, बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीची भव्य मिरवणूक निघेल, तरी या कार्यक्रमाला गावातील नागरिक विद्यार्थी युवक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान, आदर्श देवगावचे विद्यमान सरपंच मुकुंद सुरवसे, उपसरपंच महादेव सुरवसे, महेश सुरवसे, दादासाहेब जाधव व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती देवगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## हेल्मेट नसेल तर कारवाईच..! पोलीस निरीक्षकाने चक्क आपल्याच ट्रॅफिक हवालदाराला दंड ठोठावला

**केज । प्रतिनिधी**

दुचाकीवर प्रवास करताना स्वतःच्या सुरक्षेसाठी हेल्मेट वापरणे अत्यंत गरजेचे आहे. अनेक शासकीय व निमशासकीय कर्मचारी सुद्धा हेल्मेट वापर करीत नसल्याने केज पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक उनवणे यांनी वाहतूक शाखेचे पोलिस हवालदार यांना एक हजाराचा दंड ठोठावला. रस्ते अपघातात दुचाकी स्वारांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन मोठ्या प्रमाणात मृत्यू होत असल्याने दुचाकी स्वार आणि पाठीमागे बसलेला या दोघानीही हेल्मेट घालणें अनिवार्य आहे. त्या संदर्भात त्याची अंमलबजावणी सुरू आहे.

सोमवारी (दि. २०) सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास केज पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे हे पोलिस ठाण्याच्या आवारात असताना त्याच वेळी वाहतूक शाखेचे हवालदार हे विना हेल्मेटचे मोटार सायकलवर येत असल्याचे दिसताच स्वामील उणवणे यांनी त्यांना एक हजारा चा ऑनलाईन दंड देऊन त्याचे ई चालान फाडले.

भारतात रस्ते अपघातांचे प्रमाण अत्यंत चिंताजनक असून, हेल्मेट न वापरणे हे दुचाकीस्वारांच्या मृत्यूचे प्रमुख कारण बनले आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या आकडेवारी नुसार, दरवर्षी ५०,००० हून अधिक दुचाकीस्वारांचा जीव जातो, ज्यामध्ये बहुतेकजण हेल्मेट वापरत नाहीत.



**बीड : शहरातील नामांकित एलिट केअर हॉस्पिटलच्या वतीने आयोजित ईद मिलाप तसेच हॉस्पिटल स्थलांतर सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या प्रसंगी प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रमाला विशेष रंगत आली. यावेळी डॉ.आमेर इनामदार यांना त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देताना अखिल भारतीय पत्रकार सुरक्षा समितीचे बीड जिल्हाध्यक्ष पठाण अमरजान व शीश मजीद शेख छायाचित्रात दिसत आहेत.**

## पीर बाबा उरूसात आरोग्य सेवेची पर्वणी; २४ एप्रिलला 'वांग-भाकर' जेवणाचीही व्यवस्था

**आष्टी । प्रतिनिधी**

ग्रामदैवत हजरत सय्यद नसरुद्दीन शहा (पीर बाबा) यांच्या उरूस उत्सवानिमित्त गावात धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांची उत्साहात सांगड घातली जात आहे. नागरिकांच्या आरोग्याची काळजी लक्षात घेऊन सर्वरोग निदान मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

दौलावडगाव प्राथमिक आरोग्य केंद्र, साई माऊली सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल (अहमदनगर) तसेच यात्रा कमेटी व ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर गुरुवार, २३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत पीर बाबा दर्गा परिसरात होणार आहे. या शिबिरात डॉ. संतोष गिते (एम.डी. मेडिसिन), डॉ. गणेश गिते (अस्थिरोग तज्ञ), डॉ. सौ. विजयश्री गिते (नेत्र तज्ञ), डॉ. संजय अकोलकर, डॉ. फसले चक्रधर, डॉ. समाधान जाधव, डॉ. सौ. निता जाधव, डॉ. समीर सय्यद, डॉ. शुभांगी फसले, डॉ. जुबेर शेख अशा विविध तज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची तपासणी करण्यात येणार असून, आवश्यक त्या औषधांचे मोफत वाटपही केले जाणार आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.



उरूस उत्सवानिमित्त २२ ते २४ एप्रिलदरम्यान भव्य संदल, छबीना मिरवणुका, आतिषबाजी, तमाशा, कुस्ती स्पर्धा आणि कव्वाली यांसारख्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, २४ एप्रिल रोजी भाविक भक्तांसाठी पारंपरिक 'वांग-भाकर' जेवणाचीही व्यवस्था करण्यात आली असून, मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या सर्व उपक्रमांमुळे दौलावडगावात सध्या उत्साह, श्रद्धा आणि सामाजिक ऐक्याचे वातावरण निर्माण झाले आहे.



## तुलसी इंग्लिश स्कूलचा पदवी समारंभ

### शौर्य डोंगरेसह युकेजी वर्गातीले विद्यार्थी सन्मानित

**बीड । प्रतिनिधी**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी सक्षम होणे गरजेचे आहे. या दृष्टीने तुलसी शैक्षणिक समूह विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन मान्यवरांनी केले. बीड येथील तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये मंगळवार (दि. २१) रोजी इयत्ता युकेजी वर्गातील विद्यार्थ्यांचा पदवी समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार सुनिल डोंगरे, डॉ. विजयकुमार बांदल, डॉ. सुनिल जोंधळे व व्हाईस प्रिन्सिपल सय्यद सिद्दिकी उपस्थित होते.

मान्यवरांनी सांगितले की, संस्था विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीबरोबरच सुसंस्कार आणि व्यक्तिमत्त्व विकासावरही भर देत आहे. यामुळे येथील विद्यार्थी सक्षम आणि जबाबदार नागरिक बनतील, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.पदवी समारंभात इयत्ता यूकेजी वर्गातील शौर्य सुनील डोंगरे याच्यासह सर्व विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. संस्थेचे संचालक प्रा. प्रदीप रोडे यांचे शाळेकडे बारकाईने लक्ष असून, प्रिन्सिपल उमा जगतकर या व्यवस्थापन, शिक्षक व विद्यार्थी यांच्यात सुसंवाद ठेवून शैक्षणिक गुणवत्ता वाढवत असल्याचे नमूद करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रिन्सिपल उमा जगतकर यांनी केले. सूत्रसंचालन शेख सरताज यांनी, तर आभार वंदना राठोड यांनी मानले. पदवी समारंभाचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी तुलसी इंग्लिश स्कुल शाळेच्या स्टाफने मोलाचे योगदान दिले.

## माजलगावात संस्कार भारतीची संगीत सभा उत्साहात संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

संस्कार भारतीच्या वतीने आयोजित 'संगीत सभा' हा सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि रसिकांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाचे आयोजन श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, जिजामाता उद्यान, मंगलनाथ कॉलनी येथे करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती माता पूजन व संस्कार भारतीच्या ध्येय गीताने करण्यात आली. या संगीत सभेत कु.श्रेया ठोंगे (संगीत विशारद) यांनी आपल्या सुरेल व भावपूर्ण आवाजात विविध रचना सादर करून उपस्थितांची मने जिंकली. सुरुवातीला राग मारू बिहाग मधील एका बंदिशीने झाली. त्यानंतर तुज मागतो मी आता, अवचिता परिमळू, वृंदावणी वेणू, काटा रुते कुणाला, उमलले आभाळ भर हे या भावगीत व भक्तिगीतांच्या सादरीकरणाने वातावरण भारावून गेले.




त्यांच्या गायनाला रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली. साथसंगत म्हणून कुणाल कुलकर्णी यांनी संवादिनीची साथ देत कार्यक्रमाची शोभा वाढवली, तर तबल्यावर गणेश विभुते यांनी तालबद्ध साथ देत सादरीकरण अधिक रंगतदार केले. यावेळी स्व. आशा भोसले यांना आदरांजली अर्पण करत धुंदी कळ्यांना, फुलले रे क्षण, सलोना सा सजन, केंव्हा तरी पहाटे, रामा रघुनंदना या अजरामर गीतांचेही सुंदर सादरीकरण करण्यात आले.

कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा.स्नेहल पाठक (अध्यक्ष, संस्कार भारती, देवगिरी प्रांत), मंगलनाथ कॉलनीतील प्रतिष्ठित गोविंद बजाज, कॉलनीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत काळे तसेच मंगलनाथ कॉलनीतील प्रत्येक नागरिक यांची उपस्थिती लाभली. त्यांनी कलाकारांचे कौतुक करत अशा सांस्कृतिक उपक्रमांमुळे भारतीय संस्कृतीचे जतन व संवर्धन होत असल्याचे प्रतिपादन केले.

मंगलनाथ कॉलनीतील व परिसरातील संगीतप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेतला. कार्यक्रमाचे आयोजन संस्कार भारती संयोजन समिती व विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, मंगलनाथ कॉलनी यांच्या वतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमावेळी सुरेश देशपांडे व नंदिनी गर्गे यांनी अतिशय उत्कृष्ट असे आशाताई भोसले यांचे पोर्ट्रेट रांगोळीने काढले होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहिणी माळेवाडीकर यांनी केले तर आभार संजय कुलकर्णी यांनी मानले. एकूणच, सुरेल गायन, उत्तम साथसंगत आणि रसिकांच्या दादेमुळे ही संगीत सभा सांस्कृतिक वातावरणात रंगून यशस्वीरीत्या पार पडली. संगीत सभा यशस्वी करण्यासाठी सुबोध देशपांडे, गणेश विभुते, सुरेश देशपांडे, नंदिनी गर्गे, कुणाल कुलकर्णी, संजय कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.

## कष्टातून यशाचे शिखर: माजलगावच्या भोई समाजातील पहिली महिला डॉक्टर स्वाती भुजंगे



**माजलगाव । प्रतिनिधी**

जिद्द आणि परिश्रमाच्या जोरावर कोणत्याही संकटावर मात करता येते, हे माजलगाव येथील डॉ.स्वाती राजाभाऊ भुजंगे यांनी सिद्ध करून दाखवले आहे. मराठवाड्यातील भोई समाजातून एम.बी.बी.एस. (चइइड) पूर्ण करणाऱ्या त्या पहिल्या महिला विद्यार्थिनी ठरल्या आहेत. त्यांच्या या यशाने संपूर्ण जिल्ह्यातून त्यांचे कौतुक होत आहे.

डॉ.स्वाती यांचे वडील, राजाभाऊ भुजंगे, व्यवसायाने मच्छीमारी व वीट भट्टी कामगार आहेत. अत्यंत सामान्य आर्थिक परिस्थिती असतानाही त्यांनी आपल्या मुलींच्या शिक्षणात कोणतीही कमतरता भासू दिली नाही. स्वतः उन्हात-पाण्यात मेहनत करून त्यांनी मुलींना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. एका मच्छीमार वडिलांच्या कष्टाचे चीज करत स्वाती यांनी वैद्यकीय क्षेत्रात हे दैदीप्यमान यश संपादन केले आहे.

स्वाती यांनी आपले एम.बी.बी.एस.चे शिक्षण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज येथून यशस्वीपणे पूर्ण केले. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी आपला आत्मविश्वास ढळू दिला नाही. भोई समाजातील मुलींनी उच्च शिक्षणाकडे वळावे, यासाठी त्यांचे हे यश मैलाचा दगड ठरणार आहे. मराठवाड्यातील भोई समाजाच्या वतीने डॉ.स्वाती भुजंगे यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले आहे. समाजातील एका मुलीने डॉक्टर होणे, ही संपूर्ण समाजासाठी अभिमानाची गोष्ट आहे, अशा भावना समाजातील मान्यवरांनी व्यक्त केल्या आहेत.

डॉ.स्वाती भुजंगे यांच्या या यशामुळे ग्रामीण भागातील अनेक मुलींना शिक्षणाची नवी उमेद मिळाली आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस 'दै.प्रवक्ता लोकशाहीचा' कडुन खूप खूप शुभेच्छा! शिक्षण हेच प्रगतीचे साधन आहे, हे स्वाती यांनी दाखवून दिले आहे.

दैनिक, **प्रवक्ता लोकशाहीचा** हे पत्र, प्रकाशक, मालक, संपादक, **मुजमुले नितीन रावण** यांनी मुद्रक,जगमित्र ऑफसेट,बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै, ता,परळी वै,जि,बीड महाराष्ट्र -४३११२२ येथे छापून दैनिक प्रवक्ता लोकशाहीचा कार्यालय, रावण मुजमुले हाऊस नं.८०४, बिल्डींग नं.१९६ कानोबा नगर नाथापूर रोड, न्यू जीवनदीप सिनीयर कॉलेज पिंपळनेर ता.जि.बीड महाराष्ट्र -४३११२२ येथे प्रकाशित केले, (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील) मो,९६७३२१०४३८ - ई-मेल- pravaktalokshahichagmail. com

The Daily newspaper, Pravakta Lokshahicha, is published by its publisher, owner, and editor, Mujmule Neetin Rawan. It is printed at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vaijnath, Taluka Parli Vaijnath, District Beed, Maharashtra - 431122, and published from the Pravakta Lokshahicha Daily office, S/O RAWAN MUJMULE HOUSE NO. 804,BUILDING NO .196 KANOBA NAGAR NATHAPUR ROAD NEAR JEEVANDEEP SENIOR COLLEGE PIMPALNER TAL.DIST.BEED, Maharashtra - 431122. (The editor may not necessarily agree with the content and news published in the Daily. The responsibility for selecting the content rests with them as per the PRB Act.) Mobile: 9673210438 - Email: pravaktalokshahicha@gmail. com